मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २०३ ■ शुक्रवार, ०३ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ. रागिणी नायक, जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत रायगडावर!

### रायगड किल्ला पाहून मी धन्य झाले : रागिणी नायक

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी** : रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार प्रत्यक्षात जगणारे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत, तसेच काँग्रेसच्या दिल्लीतून आलेल्या राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ. रागिणी नायक बुधवारी (ता.१) सकाळी रायगड किल्ल्यावर शिवरायांच्या चरणी नतमस्तक झाले. यावेळी रायगड किल्ला आणि शिवरायांची महती फक्त ऐकून असलेल्या रागिणी नायक रायगड किल्ला 'याचि देही याचि डोळा' पाहून भारावून गेल्या. "शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते. असा राजा जगात झाला



नाही आणि होणारही नाही. जेथे शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. तोच हा रायगड किल्ला!" असे काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी राष्ट्रीय प्रवक्त्या रागिणी नायक यांना सांगितले. 'आज मी शिवाजी महाराज यांचा रायगड किल्ला पाहून धन्य झाले!'

असे उद्गार रागिणी नायक यांनी यावेळी काढले. यावेळी शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, युवक अध्यक्ष निखिल ढवळे आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# केंद्र सरकारचा मोठा निर्णय!

## पेट्रोकेमिकल उत्पादनांवरील सीमा शुल्क पूर्णपणे माफ

**नवी दिल्ली** : पश्चिम आशियातील सततचा तणाव आणि जागतिक पुरवठा साखळीतील व्यत्ययांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने 30 जून 2026 पर्यंत प्रमुख पेट्रोकेमिकल उत्पादनांवरून सीमा शुल्क (Customs Duty) पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेतलाय. अर्थ मंत्रालयाने गुरुवारी ही घोषणा केलीय.

एका निवेदनात मंत्रालयाने नमूद केले की, देशांतर्गत अत्यावश्यक पेट्रोकेमिकल कच्च्या मालाची अखंड उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी संबंधित उद्योगांवरील (downstream industries) खर्चाचा बोजा कमी करण्यासाठी आणि पुरवठ्यातील स्थिरता



राखण्यासाठी एक तात्पुरता आणि लक्षित दिलासा म्हणून हे पाऊल उचलण्यात आलंय.

सरकारच्या मते, या निर्णयाचा फायदा प्लास्टिक, पॅकेजिंग, वस्त्रोद्योग, औषधनिर्माण (फार्मा), रसायने, वाहन सुटे भाग (auto components) आणि इतर उत्पादन उद्योगांसारख्या क्षेत्रांना होण्याची अपेक्षा आहे. यामुळे अंतिम उत्पादनांच्या ग्राहकांनाही दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

या सवलतीमध्ये समाविष्ट असलेल्या प्रमुख पेट्रोकेमिकल उत्पादनांमध्ये निर्जल अमोनिया (anhydrous ammonia), टोल्युइन, स्टायरिन, डायक्लोरोमेथेन, विनाइल क्लोराईड मोनोमर, मिथेनॉल, आयसोप्रोपाइल अल्कोहोल, मोनोइथिलीन ग्लायकोल (MEG) आणि फिनॉल यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त ॲसिटिक ॲसिड, विनाइल ॲसिटेट मोनोमर, प्युरिफाईड टेरेफ्थॅलिक ॲसिड (PTA), अमोनियम नायट्रेट, इथिलीनचे पॉलिमर, इपॉक्सी रेझिन्स, फॉर्मल्डिहाइड, युरिया-फॉर्मल्डिहाइड, मेलामाइन-फॉर्मल्डिहाइड आणि फिनॉल-फॉर्मल्डिहाइड यांसारख्या उत्पादनांचाही या यादीत समावेश करण्यात आलाय.

वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या अधिपत्याखाली सरकारने गेल्या महिन्यातच एक निर्णय घेतला होता. त्यानुसार, 'RoDTEP' (निर्यात केलेल्या उत्पादनांवरील शुल्क आणि करांची माफी) योजनेअंतर्गत पात्र असलेल्या सर्व निर्यात उत्पादनांसाठीचे दर आणि मूल्याची कमाल मर्यादा (value caps) 23 मार्चपासून पूर्ववत (restore) करण्यात आलीय. वाढता मालवाहतूक खर्च आणि युद्धाशी संबंधित व्यापारी जोखीम (विशेषतः आखात आणि पश्चिम आशियातील सागरी मार्गांमधील व्यत्ययांच्या पार्श्वभूमीवर) यांचा सामना करणाऱ्या भारतीय निर्यातदारांना वेळेवर दिलासा देणे हा या निर्णयाचा मुख्य उद्देश आहे.

सरकारने स्पष्ट केले की, अल्पकालीन आव्हानांचा सामना करण्यासाठी भारताकडे कच्च्या तेलाचा, पेट्रोलचा, डिझेलचा, ATF (विमान इंधन), LPG आणि LNG चा पुरेसा साठा उपलब्ध आहे. शिवाय देश विविध जागतिक पुरवठादारांकडून आपला ऊर्जा पुरवठा अखंडपणे सुरू ठेवून आहे.

# पनवेलमध्ये आरोग्य क्रांतीची नांदी; सभापती ममता प्रितम म्हात्रे यांचा ठोस प्रस्ताव

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल** : पनवेल महानगरपालिका सभागृहात झालेल्या बैठकीत महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे यांनी मातृ-शिशु आरोग्याशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा व दूरदृष्टी असलेला प्रस्ताव मांडला.या सभेला सन्माननीय महापौर, आयुक्त, उपमहापौर, सभागृह नेते, स्थायी समिती सभापती, विरोधी पक्ष नेते तसेच सर्व नगरसेवक आणि पत्रकार उपस्थित होते.

ममता म्हात्रे यांनी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या, दरवर्षी नोंद होणाऱ्या हजारो गरोदर माता आणि त्यापैकी मोठ्या प्रमाणावर असलेल्या 'हाय-रिस्क' मातांचा गंभीर मुद्दा उपस्थित केला. गरोदर माता आणि नवजात बालकांना वेळेवर व सुरक्षित रक्त उपलब्ध होणे ही अत्यंत महत्त्वाची गरज असून, सध्या त्यासाठी मोठ्या प्रमाणावर खाजगी रक्तपेढ्यांवर अवलंबून राहावे लागत असल्याचे



त्यांनी नमूद केले. या पार्श्वभूमीवर मातृ-शिशु मृत्यूदर कमी करण्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार व विनामूल्य आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण उपाययोजना त्यांनी सुचवल्या.

महानगरपालिकेची स्वतःची सुसज्ज व अत्याधुनिक मॉडेल ब्लड बँक उभारावी, १०८ रुग्णवाहिका सेवेच्या धर्तीवर 'ब्लड ऑन कॉल' सेवा सुरू करावी, हाय-रिस्क मातांसाठी डेटाबेस व ट्रॅकिंग सिस्टम विकसित करावी व पोषण योजना राबवावी, महिला व बालकल्याण समितीमार्फत रक्तदान जनजागृती व महिला रक्तदान शिबिरे आयोजित करावीत, खासगी रुग्णालये व रक्तपेढ्यांचे ऑडिट करून पारदर्शकता सुनिश्चित करावी. या प्रस्तावामागील मुख्य उद्देश स्पष्ट करताना त्यांनी ठामपणे सांगितले की, "कोणत्याही मातेला रक्तासाठी एकही रुपया मोजावा लागू नये आणि रक्ताच्या अभावामुळे एकही माता किंवा बालकाचा जीव धोक्यात येऊ नये." यावेळी त्यांनी पुढे सांगितले की,

देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सकारात्मक बदल होत असून, "सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास" या तत्वानुसार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सुविधा पोहोचवण्यावर भर दिला जात आहे. भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेनुसार महिला सक्षमीकरण, मातृ-शिशु संरक्षण आणि सर्वांसाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करणे हे सर्वोच्च प्राधान्य आहे. पनवेल महानगरपालिका देखील याच धर्तीवर काम करत, मातृ-शिशु आरोग्य क्षेत्रात राज्यात आदर्श निर्माण करण्यासाठी पुढाकार घेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भाजपा नेते श्री. प्रितम म्हात्रे म्हणाले की,"भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेनुसार महिला व बालकल्याण आणि सर्वसामान्यांच्या आरोग्याला प्राधान्य देणे ही आपली भूमिका आहे. सभापती सौ. ममताताई प्रितम म्हात्रे यांनी प्रशासनाशी समन्वय साधत अत्यंत महत्त्वाचे आणि दूरदृष्टीचे विषय सभागृहात मांडले असून, हा प्रस्ताव पनवेलच्या आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम करणारा ठरेल."

शेवटी, "माता सुरक्षित तर कुटुंब सुरक्षित" या भावनेतून मांडलेल्या या प्रस्तावास सभागृहाने एकमताने पाठिंबा द्यावा व प्रशासनाने तातडीने अंमलबजावणी सुरू करावी, अशी विनंती सभापती सौ.ममताताई प्रितम म्हात्रे यांनी केली.

## पनवेल येथे आयोजित काँग्रेसच्या संघटन सृजन अभियानाला कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर)** : पनवेल शहरातील तथास्तु सभागृह येथे काँग्रेस पक्षाला उभारी देण्यासाठी संघटन सृजन अभियान आयोजित करण्यात आले आहे. या बैठकीत राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ. रागिणी नायक यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. प्रतिकूल परिस्थितीत काँग्रेस पक्षाला पुन्हा उभारी देण्यासाठी नेहरू-गांधी यांच्या विचारांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ. रागिणी नायक, प्रदेश निरीक्षक ॲड तौफिक मुलाणी, प्रदेश निरीक्षक श्रीरंग बरगे, पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटी जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधला. याप्रसंगी बोलताना राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ. रागिणी नायक यांनी सांगितले कि, राहुल गांधी, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या मार्गदर्शनानुसार गावा-




गावात जाऊन आम्ही विविध समाजातील लोकांशी संवाद साधून त्यांचे प्रश्न जाणून घेतले. समाजातील शेवटच्या व्यक्तीला न्याय देण्यासाठी काँग्रेस प्रयत्न करत आहे. त्याचप्रमाणे पक्षांतर्गत मोठ्या प्रमाणात बदल घडणार असून कार्यकर्त्यांशी संवाद साधत त्यांच्या भावना जाणून घेत आहोत. त्याप्रमाणे नवीन कार्यकारिणी जाहीर करणार असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर सुद्धा हल्ला करत ते देशाचे नुकसान करत असल्याचे सांगितले.यानंतर त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष हेमराज म्हात्रे, महिला आघाडी प्रभारी चंद्रकला नायडू, नगरसेवक हरेश केणी, लतीफ शेख, कामगार नेते वैभव पाटील, ॲड श्रुती म्हात्रे, शशिकांत बांदोडकर, डॉ अमित दवे, अमित लोखंडे, सुधीर मोरे, राकेश जाधव आदी उपस्थित होते.

## विचुंबेत भव्य जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन

**लोकनेते रामशेठ ठाकूर अमृतमहोत्सव वर्ष व सरपंच प्रमोद भिंगारकर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम**

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त तसेच विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शनिवार, दिनांक ०४ एप्रिल रोजी रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने भव्य जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा विचुंबे येथील विठ्ठल-रखुमाई मैदान येथे सायंकाळी ४ वाजता सुरू होणार असून, या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, महापौर नितीन पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, नगरसेवक परेश ठाकूर, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील यांच्यासह अनेक स्थानिक लोकप्रतिनिधी व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# कोकण विभागीय आयुक्तपदी श्रीमती रुबल अग्रवाल विराजमान

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : प्रशासकीय क्षेत्रातील आपल्या धडाकेबाज कार्यशैलीसाठी ओळखल्या जाणाऱ्या ज्येष्ठ सनदी अधिकारी रुबल अग्रवाल यांनी सोमवार, 30 मार्च 2026 रोजी कोकण विभागीय आयुक्त पदाची सूत्रे स्वीकारली आहेत. त्यांनी प्रभारी विभागीय आयुक्त सिद्धराम सालीमठ यांच्याकडून या पदाचा कार्यभार अधिकृतपणे स्वीकारला.2008 च्या बॅचच्या आयएएस (IAS) अधिकारी असलेल्या रुबल अग्रवाल यांनी आपल्या कारकिर्दीत विविध महत्त्वाच्या पदांवर काम करून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. यापूर्वी त्यांनी सोलापूर येथे सहायक जिल्हाधिकारी म्हणून आपल्या सेवेला सुरुवात केली होती. त्यानंतर अहमदनगर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) आणि अहमदनगर तसेच जळगाव येथे जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी यशस्वी कामकाज पाहिले आहे. श्रीमती रुबल अग्रवाल या शिर्डीच्या श्री साईबाबा संस्थान ट्रस्टच्या



पहिल्या महिला मुख्य कार्यकारी अधिकारी होत्या. त्यांच्या काळात साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे नियोजन अत्यंत भव्य आणि शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. त्या पुणे महापालिकेत अतिरिक्त महापालिका आयुक्त म्हणून कार्यरत असताना त्यांनी कोविड-2019 च्या भीषण संकटाचे व्यवस्थापन अत्यंत प्रभावीपणे केले. त्यांच्या या कामगिरीची दखल राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली होती. यापूर्वी त्यांनी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या (ICDS) आयुक्त म्हणून राज्यातील1 लाख 10 हजार अंगणवाड्यांचे जाळे सक्षमपणे हाताळले आहे.श्रीमती रुबल अग्रवाल यांच्या उत्कृष्ट प्रशासकीय सेवेबद्दल त्यांना आतापर्यंत उत्कृष्ट जिल्हाधिकारी पुरस्कार (महाराष्ट्र शासन, 2016-17), महात्मा गांधी शांतता पुरस्कार (जळगावमध्ये कायदा व सुव्यवस्था राखल्याबद्दल), अरुण बोंगीरवार सार्वजनिक सेवा उत्कृष्टता पुरस्कार (पुणे शहरातील कोविड नियंत्रणासाठी), स्मार्ट सिटी डिजिटल पेमेंट आणि ई-गव्हर्नन्स पुरस्कार अशा अनेक प्रतिष्ठित महत्त्वाच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. कोकण विभाग हा भौगोलिक आणि प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा विभाग मानला जातो. या विभागातील महसूल प्रशासन, पायाभूत सुविधांचे प्रकल्प आणि आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांत रुबल अग्रवाल यांच्या दांडग्या अनुभवाचा मोठा फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी विभागातील कामकाजाचा आढावा घेण्यास सुरुवात केली असून, जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्याला आपले प्राधान्य असेल, असे त्या यावेळी म्हणाल्या.

## श्री छत्रपती पतसंस्थेला नवे नेतृत्व : दिपक निंबाळकर चेअरमनपदी

**दैनिक युवक आधार**

**सणसर /विकास क्षत्रिय** : श्री छत्रपती माध्य व उच्च माध्यमिक सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी श्री दिपक जगनाथ निंबाळकर तर व्हा. चेअरमनपदी श्री युवराज सोपान साळुंखे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.बुधवार (दि.01) रोजी भवानीनगर येथील पतसंस्था कार्यालयात ही निवड प्रक्रिया पार पडली.

माजी चेअरमन श्री विजय आप्पासो यादव यांचा कार्यकाल संपल्याने रिक्त चेअरमन पदासाठी दिपक निंबाळकर यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली.निवडणूक निर्णय अधिकारी तथा



सहाय्यक दुय्यम निबंधक श्री बापूसाहेब शिवरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया पार पडली.

यावेळी सर्व संचालक,संचालिका व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. संस्थेच्या हितासाठी सर्वांना विश्वासात घेऊन योग्य पद्धतीने काम करण्याचे आश्वासन नवनिर्वाचित अध्यक्ष श्री दिपक निंबाळकर यांनी दिले.

# महादेवी बारस निमित्त देवनीत जंगी कुस्ती स्पर्धा; विजेत्या पैलवानांचा सत्कार



**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम :** महादेवी बारस, शिवपार्व ती विवाह सोहळा व महादेव यात्रेनिमित्त देवनी शहरात जंगी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

दुपारी दोन वाजल्यानंतर कुस्त्यांना प्रारंभ झाला. विविध गटांतील कुस्त्यांमध्ये पैलवानांनी दमदार कामगिरी करत प्रेक्षकांचे मनोरंजन केले. स्पर्धेत रमेश बिरादार तसेच नागेश येडडे यांनी विजय मिळवत प्रत्येकी ₹५,००० चे बक्षीस जिंकले. तर हनुमंत केळगिरे यांनी ₹३,००० चे बक्षीस पटकावत तिघांनी देवनी शहराचे नाव उज्ज्वल केले.

स्पर्धेतील अंतिम व आकर्षक कुस्ती ₹११,००० बक्षीसाची ठेवण्यात आली होती. हे बक्षीस देवनीचे माजी सरपंच देविदास पतंगे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. तसेच विजेत्यांना चांदीची गदा दत्ता तपसाळे व दिनेश तपसाळे यांच्याकडून देण्यात आली. अंतिम कुस्तीचे विजेते प्रसाद शिंदे (रा. सावरगाव, जि. लातूर) यांचा शाल, श्रीफळ व चांदीची गदा देऊन विशेष सत्कार करण्यात आला. तसेच यात्रा कमिटीच्या वतीने महादेव मंदिरातही त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. संजय घोरपडे, उपनगराध्यक्ष अमित मानकरी, बालाजी वळसांगवीकर, नगरसेवक नदीम मिर्झा, महादेव मळभागे, शेख गुरुजी, अमित (बंटी) सूर्यवंशी, होमगार्ड संजय सावरगावे, डॉ. अनिल इंगोले, आनंद जीवने, शेंडगे मामा, बाबुराव लांडगे, शिवा कांबळे आदींनी विशेष परिश्रम घेतले. सर्व समाजघटकांचा सहभागही उल्लेखनीय होता.

दरम्यान, महादेव मंदिर यात्रा कमिटीच्या एका लिंगायत समाजाची रचनेबाबत नागरिकांकडून सामाजिक समतोल राखला गेला नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. तसेच आगामी नगरपंचायत निवडणुकीच्या हिंदू धर्म पार्श्वभूमीवर या मुद्द्यावर मते मागत असल्यास त्यांना कात्रज चा घाट कसे दाखवायचे चर्चा सुरू असल्याचे चित्र आहे. नगरपंचायत सत्ताधाऱ्यांकडून आयोजित शेवटच्या यात्रांपैकी हे एक आयोजन असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगत आहे.

# अशोक पाटील यांनी शाळेशी जिव्हाळ्याचे संबंध जोडले - राजेंद्र खारपाटील

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** चिरनेर येथील पी पी खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या पी.डी. खारपाटील माध्यमिक शाळा व राजेंद्र खारपाटील उच्च माध्यमिक शाळेचे वरिष्ठ लेखनिक अशोक अनंत पाटील यांनी 33 वर्ष प्रदीर्घ सेवा बजावत, आपल्या . वरिष्ठ लेखनिक पदसेवेतून 31 मार्च 2026 रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.

वरिष्ठ लेखनिक अशोक अनंत पाटील यांनी सुरुवातीच्या काळात अलिबागच्या कोकण एज्युकेशन सोसायटीत 24 वर्ष सेवा बजावली. तर पी पी खारपाटील एज्युकेशन सोसायटीत 2016 मध्ये रुजू होऊन, त्यांनी नऊ वर्ष ,नऊ महिने उत्तम सेवा बजावून त्यांनी शाळेशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवले आहेत. सत्कारमूर्ती अशोक पाटील यांचा सेवापुर्तीचा सत्कार समारंभ 25 मार्च रोजी चिरनेर शाळेत आयोजित करण्यात आला होता. यावेळी सत्कारमूर्ती अशोक पाटील व सहचारणी सपना पाटील यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, साडी चोळी व भेटवस्तू देऊन अध्यक्ष पांडुरंग खारपाटील यांच्या कुटुंबीयांतर्फे आदरपूर्वक सत्कार करण्यात आला.

यावेळी पी पी खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील यांनी अशोक पाटील यांनी आमच्या शाळेशी घरातल्यासारखे जिव्हाळ्याचे संबंध जोडले आहेत. आपण सेवेतून निवृत्त झाले आहात. तरी देखील पुन्हा या शाळेची आपल्याकडून शैक्षणिक सेवा व्हावी. अशी अपेक्षा करतो. अशा भावना उद्योगपती राजेंद्र खारपाटील यांनी व्यक्त केल्या. तर उरण तालुका पंचायत समितीच्या माजी सभापती



वैशाली पाटील यांनी अशोक पाटील यांच्या पूर्वीच्या गमतीदार स्वभावाचे आपल्या भाषणातून वर्णन करून, माझ्या संपूर्ण कुटुंबाचे त्यांच्याशी मैत्रीचे नाते असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. यावेळी शिक्षक डी.पी. पाटील यांनी त्यांच्यासाठी आणि शाळेसाठी केलेल्या कार्याची गाथा वाचून दाखवली. तसेच शैक्षणिक क्षेत्रातील वरिष्ठ लिपिक म्हणून त्यांना चांगला अनुभव असल्याचे देखील त्यांनी सांगितले. शाळेतील प्रयोगशाळेतील प्रदीप रसाळ यांनी त्यांचे कर्मचाऱ्यांबरोबर मैत्रीचे, प्रेमाचे संबंध असल्याची जाणीव करून, अशोक पाटील यांनी यापूर्वी राजकीय, सामाजिक क्षेत्रातही उत्तम निडरतेने कामगिरी केली असल्याचा उल्लेखही त्यांनी भाषणातून केला.

त्याचबरोबर सहाय्यक शिक्षक जीचंद भगत यांच्यासह अनेक नातेवाईकांनी अशोक पाटील यांचा स्वभाव व शैक्षणिक कामाबद्दल भावनिक होऊन भावना व्यक्त केल्या. शेवटी अशोक पाटील यांच्या सहचारिणी सपना पाटील यांनी आपल्या मनोगतातून अगदी भावनिक होऊन, अशोक पाटील यांना शैक्षणिक कामाविषयी वारंवार प्रोत्साहन दिले असल्याचे सांगून, कौटुंबिक आयुष्यात माझ्या पतीने आमच्या कुटुंबाचे नेतृत्व करत उत्तम साथ देली असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला अध्यक्ष पांडुरंग खारपाटील, उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, संचालिका अर्चना ठाकूर, प्रशासन अधिकारी व्ही ए पाटील, मुख्याध्यापक मिलिंद पट्टेबहादुर, मुख्याध्यापिका सुप्रिया म्हात्रे, मंदा घरत, स्मिता मसुरकर, माजी सभापती वैशाली पाटील, प्रदीप रसाळ, डी पी पाटील, जिचंद भगत, डॉ. प्रज्योत पाटील, सुरेंद्र कठोर, नवगाव मच्छीमार सोसायटीचे माजी चेअरमन, कोएसो नवगाव शाळेची विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, मुले जावई यांच्यासह नातेवाईक व मित्रपरिवार उपस्थित होते. प्राध्यापिका मंथना ठाकूर यांनी सुंदर शब्दातून सूत्रसंचालन केले.

# सशस्त्र आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश! रिसोड पोलिसांची धडाकेबाज कारवाई; लाखोंचा मुद्देमाल जप्त

## चोरीच्या मालिकेचा शेवट; पोलिसांची अचूक रणनीती यशस्वी

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : रिसोड (वाशीम)तालुक्यातील जबरी चोरीच्या मालिकेमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणाचा अखेर पर्दाफाश करत रिसोड पोलिसांनी मोठी कामगिरी बजावली आहे. अत्यंत कौशल्यपूर्ण तपासाच्या जोरावर सशस्त्र आंतरजिल्हा टोळीला गजाआड करत पोलिसांनी तब्बल ३ लाख ५७ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक २४/१२/२०२५ रोजी फिर्यादी दत्ता नामदेव उगले (वय ५०, रा. बिबखेडा शेतशिवार, मोठेगाव, ता. रिसोड, जि. वाशिम) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २३ डिसेंबरच्या रात्री त्यांच्या शेतातील कुडपत्र्याच्या घरात तीन अज्ञात आरोपींनी प्रवेश करून चाकूचा धाक दाखवत त्यांच्या आई आसराबाई उगले व पत्नी सावित्री उगले यांच्या अंगावरील दागिने, रेडमी कंपनीचा मोबाईल व रोख रक्कम असा ८१ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला होता.त्यानंतर दिनांक १०/०३/२०२६ रोजी फिर्यादी विकास विश्राम जायभाये (वय २८, रा. धाड, ता. लोणार,



जि. बुलढाणा, ह.मु. चाकोली, ता. रिसोड) यांनी तक्रार दिली की, ०९ ते १० मार्चच्या मध्यरात्री चार अज्ञात आरोपींनी त्यांच्या घरात घुसून त्यांच्या आई, पत्नी व मुलाचे सोन्या-चांदीचे दागिने ३० हजार रुपयांचे चोरून नेले. तसेच त्यांच्या शेजारील आसाराम महादा पोटे (वय २२) यांच्या घरातही चोरी करून सोन्या-चांदीचे दागिने, मोबाईल व रोख रक्कम मिळून २८ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेण्यात आला.या प्रकरणी पोलीस स्टेशन रिसोडचे ठाणेदार श्री. रामेश्वर चव्हाण यांनी डी.बी. पथकाला तपासाच्या सूचना दिल्या. त्यानुसार पथकातील अधिकारी पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, ग्रेड पोउपनि. कदीर खाँ पठाण,

> **"गुन्हेगार कितीही चलाख असले तरी कायद्याच्या कचाट्यातून सुटू शकत नाहीत. नागरिकांनी कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी."**
>
> **– श्री.रामेश्वर चव्हाण**
> **ठाणेदार,पोलीस स्टेशन रिसोड**

पोलीस हवालदार मंगेश मालवे, निलेश तायडे, तसेच पोलीस अंमलदार रवि अढागळे, विनोद घनवट, परमेश्वर भोणे, रवी इरतकर, अमोल हाके आणि सायबर सेलचे अभिनव वाघाडे यांनी तांत्रिक तपास व गुप्त माहितीच्या आधारे आरोपींचा शोध घेतला.पोलिसांनी दोन आरोपींना वेगवेगळ्या ठिकाणांहून ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्या ताब्यातून सोन्या-चांदीचे दागिने, रेडमी मोबाईल, गुन्ह्यात वापरलेला मोबाईल, एक जिवंत काडतूस, स्टीलचा खंजीर व पल्सर मोटारसायकल असा ३ लाख ५० हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. फरार आरोपींचा शोध सुरू आहे. दरम्यान, दिनांक २९/०३/२०२६ रोजी फिर्यादी सतीश दत्तराव ठोकरे (वय ४०, रा. चाफेश्वर चौक, मालेगाव नाका, रिसोड) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या किराणा दुकानातून संतोष विठ्ठल शेळके (वय ३०, रा. दिग्रस कराळे, जि. हिंगोली) याने १५ लिटरचे तीन कॅन (किंमत ७५०० रुपये) चोरून नेले होते. पोलिसांनी या आरोपीला फक्त २ तासांत अटक करून मुद्देमाल जप्त केला.

ही संपूर्ण कारवाई मा. पोलीस अधीक्षक अनुज तारे (IPS), मा. अप्पर पोलीस अधीक्षक लता फड, तसेच मा. सहायक पोलीस अधीक्षक नवदिप अग्रवाल (IPS) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.या धडाकेबाज कारवाईमुळे पीडित शेतकरी व शेतमजुरांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले असून, अल्पावधीत गुन्हा उघडकीस आणल्याबद्दल पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# कर्जाच्या विळख्यात अडकले शेतकरी

## अखेर संपूर्ण गावच विक्रीला काढण्याचा संतापजनक निर्णय!

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम जिल्ह्यातील अडोळी (ता.वाशिम) येथील शेतकऱ्यांनी कर्जाच्या वाढत्या ओझ्यामुळे आणि शासनाच्या अपुऱ्या मदतीमुळे संतप्त होत थेट संपूर्ण गाव विक्रीला काढण्याचा अभूतपूर्व निर्णय घेतल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

खरीप हंगामात सोयाबीनसह विविध पिके काढणीला आलेली असतानाच अतिवृष्टीने अक्षरशः हैदोस घालत शेतकऱ्यांचा तोंडचा घास हिरावून घेतला. या नैसर्गिक संकटामुळे आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांनी शासनाकडे कर्जमाफीची मागणी केली होती. त्यानंतर राज्य सरकारने दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर केली खरी; मात्र या निर्णयामध्ये जाचक अटी व शर्ती घालून प्रत्यक्ष लाभापासून अनेक शेतकरी वंचित राहिल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

"निवडणुकीत सरसकट सातबारा कोरा करण्याचे आश्वासन देण्यात आले होते, पण प्रत्यक्षात केवळ अटींचा खेळ करून शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली," अशी तीव्र प्रतिक्रिया अडोळी येथील शेतकऱ्यांनी व्यक्त केली. याशिवाय, वाशिम जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना अद्यापही पीक विम्याची रक्कम मिळालेली नाही. दुसरीकडे, खाजगी फायनान्स




कंपन्यांकडून सुरू असलेल्या वसुलीच्या दबावामुळे शेतकऱ्यांची अवस्था अधिकच बिकट झाली आहे.

"हातात पैसे नाहीत, पीक नाही, विमा नाही… मग कर्ज फेडायचे कसे?" असा ज्वलंत प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. या सर्व परिस्थितीमुळे हतबल झालेल्या ग्रामस्थांनी "मागण्या मान्य करा, अन्यथा आम्हाला इच्छामरणाची परवानगी द्या," अशी धक्कादायक मागणी शासनाकडे केली आहे.

याच संतापातून अडोळी गावातील सर्व ग्रामस्थांनी एकत्र येत थेट संपूर्ण गाव विक्रीला काढण्याचा निर्णय घेतला. याबाबतचे निवेदन १ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्याच्या मुख्यमंत्र्यांना पाठवण्यात आले आहे.

दरम्यान, गावात लावण्यात आलेल्या "गाव विक्रीला आहे" या बॅनरमुळे परिसरात एकच चर्चा रंगली असून प्रशासन आणि सरकार आता काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पनवेल वाहतूक शाखेची धडक कारवाई; सरप्राईज नाकाबंदीमुळे अवैध रिक्षाचालकांवर अंकुश

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल शहर वाहतूक शाखा आणि आरटीओ मार्फत गुरुवारी (दि. २) रात्री १० ते १२ या वेळेत सरप्राईज नाकाबंदी व विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा. पाटील, आरटीओचे पोलीस इन्स्पेक्टर भड आणि काळे यांच्या उपस्थितीत पार पडली.या मोहिमेत पनवेल रेल्वे स्थानकाच्या पूर्व व पश्चिम परिसरातील रिक्षाचालकांची सखोल पडताळणी करण्यात आली. अवैध प्रवासी वाहतूक करणारे, फिटनेस व विमा कालबाह्य असलेले, विना परवाना (लायसन्स), विना



युनिफॉर्म रिक्षाचालक / मालक व तीव्र प्रकाशाची लाईट असे विविध मोटर वेहिकल ॲक्ट कलम अंतर्गत नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात आली. नाकाबंदीदरम्यान कारवाईच्या भीतीने रिक्षांची संख्या कमी झाल्याने प्रवाशांची गैरसोय होऊ नये, यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक पाटील यांनी तत्काळ एनएमएमटी विभागाशी संपर्क साधून अतिरिक्त बसची व्यवस्था केली. त्यामुळे प्रवाशांना सुरक्षित व वेळेवर त्यांच्या इच्छित स्थळी पोहोचविण्यात आले. रात्रीच्या वेळी केलेल्या या तातडीच्या मदतीमुळे प्रवाशांनी वाहतूक शाखेचे कौतुक केले.या मोहिमेत एकूण १२० रिक्षांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ३८ रिक्षांवर कारवाई करण्यात आली. तसेच १ रिक्षा जप्त करण्यात आली असून, १ प्रकरणात मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यावर (ड्रंक अँड ड्राईव्ह) कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा. पाटील यांच्या उपस्थितीत पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने, पोलीस हवालदार युवराज येळे, अमीर मुलानी, केशव निकम, संजय ओंबासे तसेच पोलीस शिपाई निलेश ठाकूर ,महेश बोरेकर व नवीन पनवेल (पोलीस मित्र) यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. पनवेल वाहतूक शाखेमार्फत पुढील काळातही अशा प्रकारच्या धडक मोहिमा राबविण्यात येणार असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी सांगितले आहे.

!! श्री !!
लेगसी कन्सल्टन्सी & डेव्हलपर्स

उपलब्ध सुविधा
* मटेरियल सहित * बिल्डींग प्लॅन * आर्किटेक्चरल ड्रॉईंग * स्टील डिझाईन * वास्तु * इंटिरियर * 3D डिझाईन * इलेक्ट्रीकल-प्लंबिंग ड्रॉईंग * लॅंडस्केपिंग ड्रॉईंग * इस्टीमेट * ब्लुप्रिंट * प्रोग्रेस रिपोर्ट * सर्वेईंग इ.
इंजि. सुरज नेहरु गंगाजी B.E.Civil (M.Tech.Structure) 9764803044
इंजि. संकेत संतोष कोटगिरे B.E.Civil (Govt.Cont.) 9421122855
इंजि. प्रज्वल संजय गोरे D.C.E. BE Civil 7249068045

लेगसी कन्सल्टन्सी अँड डेव्हलपर्स, उदगीर ही केवळ एक सल्ला आणि बांधकाम कंपनी आहे, आर्किटेक्चर फर्म नाही.

# भोंदू बाबा अशोक खरात वर कारवाई आणि जादुटोणा विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी

**दैनिक युवक आधार**

**नागपूर दक्षिण/ डॉ सुनिल भगत** : ज्योतिषी-बाबा-बुवा आणि राजकारणी-सरकारी अधिकारी-धनदांडग्या प्रभावशाली व्यक्ती यांची साठगाठ किती भयानक शोषणकारी असते याचे हादरवून टाकणारे चित्र ज्योतिषी भोंदूबाबा अशोक खरातच्या प्रकरणातून पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या समोर आले आहे.

या प्रकरणाचा निःपक्षपाती तपास होऊन अशोक खरात आणि इतर गुन्हेगारांना कडक शासन झालेच पाहिजे तसेच पुन्हा असे प्रकार घडू नयेत यासाठी पुढील मुद्द्यांची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच् नागपूर च्या वतीने पोलिस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक नागपूर यांना करण्यात आली.

१)*पोलीस स्टेशनमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष*

प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन कक्षाची स्थापना करण्याचा शासनाचा निर्णय आहे. हे अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष प्रत्यक्ष कार्यान्वित करणे आवश्यक आहे.






पत्रकार, महिला, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील कार्यकर्त्यांना सदर अंधश्रद्धा निर्मूलन कक्षाचे सदस्य म्हणून जोडून घेऊन त्यांच्या नियमित बैठका झाल्या तर परिसरात चालणारे अघोरी प्रकार वेळीच समोर येतील व त्यांना पायाबंद घालता येईल. त्यासाठी फक्त कागदावर असलेले हे अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष आपल्या जिल्ह्यात कार्यान्वित व्हावेत अशी आमची मागणी करण्यात आली.

२ *भोंदूबाबांसंदर्भातील तक्रारींची दखल घेणे*

भोंदूबाबा, ज्योतिषी यांनी शोषण केलेल्या पीडित व्यक्तींसाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती एक हेल्पलाइन सुरू करत आहे. याद्वारे प्राप्त झालेल्या तक्रारींचे तथ्य तपासून अंनिस वेळोवेळी त्या तक्रारींची यादी पोलिसांना देणार आहे. तसेच सामान्य नागरिक व पीडित व्यक्ती या बुवा बाबांकडून होणाऱ्या शोषणासंदर्भात अंनिस कार्यकर्त्यांशी संपर्क साधत असतात. प्रत्येक जिल्ह्यातील अशा प्रमुख शोषणकारी भोंदू बुवाबाबांची यादी व शक्य असेल तेथे यासंदर्भातील पुरावे असलेला पेन ड्राईव्ह अंनिसचे कार्यकर्ते जिल्हा पोलिस अधिक्षकांच्या सुपूर्त करतील. त्याची योग्य ती दखल घेण्यात येईल अशी मागणी करण्यात आली.

४ *सोशल मीडियातून होणाऱ्या अंधश्रद्धा प्रसाराला अटकाव*

सोशल मीडियातून बाबा- बुवा, ज्योतिषी, मंत्र-तंत्र यांच्या रील्सचा लोकांवर अक्षरशः भडिमार होत आहे. औरंगाबाद खंडपीठाच्या या संदर्भातील निर्णयाला अनुसरून शासनाने अंधश्रद्धा पसरवणाऱ्या जाहिरातींचे नियमन करणारी स्वतंत्र यंत्रणा तातडीने तयार करायला हवी यासाठी अपेक्षित असलेले सर्व सहकार्य अंनिसचे कार्यकर्ते आपल्याला करतील असे निवेदनात नमूद केले गेले.

ह्या निवेदन देताना राज्य कार्यकारणी सदस्य रामभाऊ डोंगरे, विजया श्रीखंडे, जिल्हा प्रधान सचिव डॉ सुनिल भगत, जिल्हा उपाध्यक्ष गौतम पाटील, देवानंद बडगे, मंगला गाणार, विजया ठाकरे,डॉ विकास होले , दीप्ती नाईक, सुषमा शेवडे, डॉ जयप्रकाश बोधी धोंगडे, विजय सुरवाडे, वर्षा सहारे श्री गडेकर आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# कष्ट, कर्तृत्व आणि कलेचा संगम : डॉ. कादंबरी महाजन यांची प्रेरणादायी यशोगाथा

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी :** पाचोरा येथील प्रतिष्ठित व विद्वान कुटुंबातील कन्या डॉ. कादंबरी संदीप महाजन यांनी आपल्या जिद्द, मेहनत आणि बहुआयामी गुणांच्या बळावर अल्पावधीतच उल्लेखनीय यश संपादन केले आहे. पाचोरा येथील ज्येष्ठ पत्रकार तथा ध्येय करिअर अकॅडमीचे संचालक, श्री गो से हायस्कूलचे माजी उपशिक्षक, तसेच पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे माजी संचालक, स्वातंत्र्य सैनिक तथा पाचोरा नगरपालिका माजी ऑक्ट्रॉय इन्स्पेक्टर डी एल महाजन यांचे सुपुत्र संदीप दामोदर महाजन आणि श्री गो से हायस्कूलच्या उपशिक्षिका सौ शितल महाजन यांची कन्या असलेल्या कादंबरीने आपल्या कुटुंबीयांच्या सामाजिक व शैक्षणिक परंपरेला साजेसा मान उंचावला आहे. नुकतीच नवी मुंबई येथे Bachelor of Physiotherapy (BPT) ही पदवी प्राप्त करून तिने आपल्या व्यावसायिक आयुष्याची भक्कम पायाभरणी केली असून तिचा पुढील प्रवास अधिक उज्ज्वल होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. डॉ. कादंबरी महाजन या नवोदित फिजिओथेरपिस्ट म्हणून कार्यरत असून त्यांनी एमजीएम स्कूल ऑफ फिजिओथेरपी नवी मुंबई येथून आपले शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांनी 8.04 इतका उत्तम CGPA मिळवत शैक्षणिक क्षेत्रात आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. शिक्षणाच्या काळातच त्यांनी क्लिनिकल आणि प्रात्यक्षिक अनुभवाला मोठे महत्त्व दिले असून रुग्णांचे assessment, treatment planning आणि rehabilitation प्रक्रियेतील विविध टप्प्यांमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेतला आहे. Neurological conditions आणि Musculoskeletal injuries या क्षेत्रांमध्ये त्यांची विशेष आवड असून त्यांनी या विषयांवर सखोल अभ्यास केला आहे. Patient handling, communication skills आणि therapeutic interaction यामध्ये त्यांची पकड मजबूत आहे, जे कोणत्याही यशस्वी फिजिओथेरपिस्टसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी स्वयंसेवी कार्यातही सक्रिय सहभाग घेतला आहे. विविध medical camps मध्ये volunteer फिजिओथेरपिस्ट म्हणून काम करताना त्यांनी patient assessment, basic treatment आणि योग्य मार्गदर्शन केले आहे. तसेच रुग्णांना posture, exercise आणि injury prevention याबाबत मार्गदर्शन करून त्यांनी समाजसेवेचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे. Healthcare professionals सोबत समन्वय साधून त्यांनी community care देण्याचे कार्यही प्रभावीपणे पार




पाडले आहे. डॉ. कादंबरी महाजन यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण पैलू म्हणजे त्यांची कला क्षेत्रातील आवड आणि प्राविण्य. सध्या त्या अंधेरी येथे डान्स कोरिओग्राफीचे शिक्षण घेत असून मुंबई येथील सुमीत खेतान यांच्या Events & Talent Management संस्थेमध्ये प्रशिक्षण घेत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी दुबई, बहरेन, कतार आणि अबुधाबी येथे dance choreography आणि विविध कार्यक्रमांचे सादरीकरण केले आहे, ही बाब निश्चितच अभिमानास्पद आहे. तसेच त्यांनी विविध नामांकित national व international कंपन्यांचे Brand Ambassador म्हणूनही काम केले असून आपल्या व्यक्तिमत्त्व, सादरीकरण आणि संवाद कौशल्याच्या जोरावर त्यांनी त्या क्षेत्रातही ठसा उमटवला आहे. याशिवाय मुंबई येथील गोरेगाव स्पोर्ट क्लबवर आयोजित तीन दिवसीय गीत-नृत्य नाट्य प्रस्तुतीमध्ये त्यांनी सीता मातेची मुख्य भूमिका साकारत आपल्या अभिनय आणि नृत्यकौशल्याची प्रभावी झलक दाखवली आहे. शालेय जीवनातही त्यांनी केवळ नृत्य क्षेत्रातच नव्हे तर क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. दिल्ली येथील नोएडा येथे संपन्न झालेल्या खो-खो राष्ट्रीय स्पर्धेत त्यांनी राष्ट्रीय संघाचे कॅप्टन पद भूषवले होते, जे त्यांच्या नेतृत्वगुणांचे उत्तम उदाहरण आहे. Team spirit, leadership, time management आणि interpersonal skills या त्यांच्या मुख्य गुणांमुळे त्यांनी प्रत्येक क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. डॉ. कादंबरी महाजन यांचा पुढील मानस अत्यंत स्पष्ट आणि दूरदर्शी आहे. त्या पुढील शिक्षणासाठी Post Graduation (PG) करण्याचा विचार करत असून त्याचबरोबर डान्स कोरिओग्राफीमध्ये करिअर घडवण्याचा त्यांचा निर्धार आहे. भविष्यात स्वतःचे Dance आणि Zumba classes सुरू करून समाजातील वृद्ध व्यक्ती, तसेच बाल-गोपाल, तरुण-तरूणींना योग्य मार्गदर्शन करण्याचा त्यांचा मानस आहे. त्यांच्या या बहुआयामी प्रवासातून आजच्या तरुण पिढीला प्रेरणा मिळावी अशीच अपेक्षा आहे. एकाच वेळी शिक्षण, कला आणि क्रीडा या तिन्ही क्षेत्रात संतुलन साधत यश मिळवणे ही सोपी गोष्ट नसून त्यासाठी dedication, consistency आणि hard work ची गरज असते, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे. त्यांच्या यशामागे त्यांच्या आई-वडिलांचे संस्कार, बहीण डॉ. वैष्णवी हिचे मार्गदर्शन आणि पाठबळ हे महत्त्वाचे घटक ठरले आहेत. डॉ. कादंबरी महाजन यांचा हा प्रवास केवळ वैयक्तिक यशाची कहाणी नसून समाजासाठी एक प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देत त्यांच्या यशाचा आलेख भविष्यात आणखी उंचावेल, याबद्दल शंका नाही.

# जातियवादी परीचय मेळावे घेण्यापेक्षा, विचार मंथन परीषद घेऊन भारतीय समाज व्यवस्था मजबूत केली पाहिजे - ॲड वामनराव चटप साहेब

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** ग्राम स्वराज्य महामंच च्या वतीने यवतमाळ येथे प्रथमच " विचारवंत परीषद आणि परीचय मेळावा " चे आयोजन मा मधुसूदन कोवे गुरुजी, अध्यक्ष ग्राम स्वराज्य महामंच यांनी केले होते* *या कार्यक्रमात कार्यक्रमाचे अध्यक्ष मा वामनराव सिडाम साहेब जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते, अखिल भारतीय आदिवासी विकास परीषद नई दिल्ली हे होते तर उद्घाटक म्हणून मा श्रीमती आशाताई काळे संचालिका ग्राम स्वराज्य महामंच ह्या होत्या कार्यक्रमाचे विशेष अतिथी आणि मुख्य मार्गदर्शक म्हणून मा ॲड वामनराव चटप साहेब माजी आमदार राजुरा विधानसभा क्षेत्र मा डॉ प्राचार्य पृथ्वीराज जी राजपूत अमरावती मा डॉ प्रशांत विघे साहेब, सिनेट सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती डॉ पद्मा ताई राजपूत अमरावती आणि स्वागताध्यक्ष म्हणून मा मधुसूदन कोवे गुरुजी होते* *कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मा मधुसूदन कोवे गुरुजी यांनी विचारवंत परीषद आणि परीचय मेळावा या संदर्भात प्रस्तावना मांडली आणि यवतमाळ मध्ये पहिल्यांदा " विचारवंत परीषद




आणि परीचय मेळावा" आयोजित केला आणि यशस्वी संपन्न झाला यावेळी सर्व सहभागी लोकांचा प्रतिसाद मिळाला याचा आनंद झाला असून आम्ही आपणास खुला मंच उभा करुन दिला म्हणून आपण बहुसंख्येने या परीषद मध्ये सहभागी झाले या कार्यक्रमाचे उद्घाटन समाज गौरव पुरस्कार देवुन खरे लाभार्थी मा डॉ विलास कनाके ठरले हे विचारवंत परीषद मध्ये एक वैशिष्ट्य ठरले होते* *या विचारवंत परीषद मध्ये माजी आमदार ॲड वामनराव जी चटप साहेब यांनी संपूर्ण भरुन असलेल्या सभागृहात आयोजकांचे कौतुक करत असताना म्हणाले की आजकाल जातियवादी परीचय मेळावे भरपूर होत असतात परंतु " विचारवंत परीषद आणि परीचय मेळावा " मी पहिल्यांदा पाहतोय याचा आनंद झाला समाज द्वेष निर्माण होवू नये जातियवादी विचार मनात निर्माण होवू नये आणि भारतीय समाजव्यवस्थेत लोकशाही मजबूत करण्यासाठी आज तरी सामाजिक एकोपा टिकवून ठेवण्यासाठी राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक, विचारांचे विचार मंथन झाले पाहिजे म्हणून ही विचारवंत परीषद असावी असे स्पष्ट मत ॲड वामनराव जी चटप साहेब यांनी व्यक्त केले* *डॉ प्राचार्य पृथ्वीराज जी राजपूत अमरावती यांनी सुद्धा आपल्या मार्गदर्शनातुन सहभागी साहित्यिक अभ्यासक यांना विशेष महत्त्व पुर्ण सुचना दिल्या आणि समाज गौरव पुरस्कार साठी समिक्षक म्हणून भुमिका पार पाडली* *मा डॉ प्रशांत विघे साहेब, सिनेट सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांनी सुद्धा भारतीय लोकशाही महिला सक्षमीकरण, सामाजिक आणि राजकीय, आणि सांस्कृतिक एकोपा टिकवून ठेवण्यासाठी आपण सदैव एकत्र येऊन काम करु असे अनेक प्रसंग विचारवंत परीषद मध्ये मांडले* *सामाजिक क्षेत्रात आयुष्यभर कार्य करणारे मा लक्ष्मण भिवनकर ( कोलाम समाज ) नेते मा अंबादास सलामे गोंडीधर्माचायर्य मा वसंतराव कनाके, मा जिवन कोवे मा विशाखा यवतकर, मा प्रांजली तुराणकर मा गिता मेश्राम , मा मनिषा कांबळे या लोकांना " समाज गौरव पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले* *या विचारवंत परीषद आणि परीचय मेळावा मध्ये सहभागी डॉ विलास कनाके, प्रिया डाखोडे, संगिता नागदिवे, संतोष इन्सकर, कीशोर इंगळे, राजु चांदेकर, मनिषा काटे, प्रतिभा खसाळे स्वाती बावने, मालती गावंडे, मिना वाघ, बंडू पंधरे मनिराम छाहगड कृष्णा भोंगाडे प्रेमा पत्रिवार तपस्वी ताडाम शायर शाबाद प्रा मेश्राम बाभुळगाव अनेक सहभागी सदस्य मंडळी सन्मान पत्र देण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवेंद्र सर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा मोहण जी वडतकर उपाध्यक्ष ग्राम स्वराज्य महामंच यांनी माणले समस्त लोकांनी सार्वजनिक जेवणाचा आस्वाद घेवून कार्यक्रमाची सांगता केली

# महादेवी बारस निमित्त देवनीत जंगी कुस्ती स्पर्धा ; विजेत्या पैलवानांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम :** महादेवी बारस, शिवपार्व ती विवाह सोहळा व महादेव यात्रेनिमित्त देवनी शहरात जंगी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

दुपारी दोन वाजल्यानंतर कुस्त्यांना प्रारंभ झाला. विविध गटांतील कुस्त्यांमध्ये पैलवानांनी दमदार कामगिरी करत प्रेक्षकांचे मनोरंजन केले. स्पर्धेत रमेश बिरादार तसेच नागेश येडडे यांनी विजय मिळवत प्रत्येकी ₹५,००० चे बक्षीस जिंकले. तर हनुमंत केळगिरे यांनी ₹३,००० चे बक्षीस पटकावत तिघांनी देवनी शहराचे नाव उज्ज्वल केले.स्पर्धेतील अंतिम व आकर्षक कुस्ती ₹११,००० बक्षीसाची ठेवण्यात आली होती. हे बक्षीस देवनीचे माजी सरपंच देविदास पतंगे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. तसेच विजेत्यांना चांदीची गदा दत्ता तपसाळे व दिनेश तपसाळे



यांच्याकडून देण्यात आली. अंतिम कुस्तीचे विजेते प्रसाद शिंदे (रा. सावरगाव, जि. लातूर) यांचा शाल, श्रीफळ व चांदीची गदा देऊन विशेष सत्कार करण्यात आला. तसेच यात्रा कमिटीच्या वतीने महादेव मंदिरातही त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. संजय घोरपडे, उपनगराध्यक्ष अमित मानकरी, बालाजी वळसांगवीकर, नगरसेवक नदीम मिर्झा, महादेव मळभागे, शेख गुरुजी, अमित (बंटी) सूर्यवंशी, होमगार्ड संजय सावरगावे, डॉ. अनिल इंगोले, आनंद जीवने, शेंडगे मामा, बाबुराव लांडगे, शिवा कांबळे आदींनी विशेष परिश्रम घेतले. सर्व समाजघटकांचा सहभागही उल्लेखनीय होता.

दरम्यान, महादेव मंदिर यात्रा कमिटीच्या एका लिंगायत समाजाची रचनेबाबत नागरिकांकडून सामाजिक समतोल राखला गेला नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. तसेच आगामी नगरपंचायत निवडणुकीच्या हिंदू धर्म पार्श्वभूमीवर या मुद्द्यावर मते मागत असल्यास त्यांना कात्रज चा घाट कसे दाखवायचे चर्चा सुरू असल्याचे चित्र आहे. नगरपंचायत सत्ताधाऱ्यांकडून आयोजित शेवटच्या यात्रांपैकी हे एक आयोजन असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगत आहे.

# बौद्ध धम्म परिषदेस डॉ. भीमराव य. आंबेडकर यांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी प्रकाश गवारे** : भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा नांदेड उत्तरच्या वतीने समता सैनिक दलाचे पथसंचलन व बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन शनिवार, दिनांक 4 एप्रिल 2026 रोजी माता रमाई आंबेडकर बुद्ध विहार, सहयोग नगर, नांदेड येथे करण्यात आले आहे.

या परिषदेचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा समता सैनिक दलाचे अध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या हस्ते होणार आहे. तसेच पूज्य भिक्खू बी. संघपालजी महाथेरो, पूज्य भिक्खू पायबोधी महाथेरो व पूज्य भिक्खू शिलरत्न थेरो यांची धम्मदेशना होणार आहे.कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. एस. के. भंडारे, डॉ. राजारामजी बडगे, यु. जी. बोराडे व माजी न्यायमूर्ती डॉ. यशवंतराव चावरे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ईश्वरराव जोंधळे भूषविणार असून विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

समता सैनिक दलाचे पथसंचलन सकाळी 9 वाजता क्रांतिवीर महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्यापासून प्रारंभ होणार आहे. या संचलनाचे नेतृत्व मेजर जनरल सुरेश गजभारे, लेफ्टनंट कर्नल संतोष दुंडे, लेफ्टनंट कर्नल आनंद झडते यांच्यासह इतर मान्यवरांकडे असेल.

या परिषदेस नांदेड उत्तर व दक्षिणमधील विविध शाखांचे पदाधिकारी, बौद्धाचार्य, समता सैनिक दलाचे जवान तसेच उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. परिषदेच्या यशस्वीतेसाठी विविध पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.सदर बौद्ध धम्म परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित राहून धम्माचा लाभ घ्यावा, असे आवाहन सरचिटणीस रमेश कोकरे यांनी केले आहे.

# नागपूरमध्ये ऑनलाइन फ्रॉड आणि चोरी प्रकरणी चार जण अटकेत; हुडकेश्वर पोलिसांची धडक कारवाई

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका**

**नागपूर :** शहरात वाढत चाललेल्या ऑनलाइन फसवणूक आणि चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी हुडकेश्वर पोलीस ठाण्याने मोठी कारवाई करत चार आरोपींना अटक केली आहे. ही कारवाई फिर्यादी पवन राजेश धनवीज (वय 35, शताब्दी नगर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून करण्यात आली.

फ्रॉड आणि बँक खात्याचा गैरवापर – ₹50 हजारांची ऑनलाइन फसवणूक

फिर्यादी धनवीज यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी रोशन रामप्रसाद प्रजापती व त्याचा साथीदार ईश्वर यांनी ऑनलाइन फ्रॉड करून फिर्यादीचे बँक खाते बेकायदेशीरपणे वापरात आणले आणि त्यातून ₹50,000 ते 60000 चा अनधिकृत व्यवहार केला. या गंभीर तक्रारीनंतर पोलिसांनी तपास सुरू करून आरोपींची माहिती मिळवली.

माल चोरीच्या गुन्ह्यातही एकच टोळी सक्रिय

१९ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ ते रात्री ८.३० या वेळेत माँ भगवती नगर–बिखली रोड, शेषनगर अंतिम बसस्टॉप परिसरात माल चोरीची घटना घडली होती. तपासात हेच आरोपी या प्रकरणात सामील असल्याचे उघड झाले.

अटक आरोपींची नावे

1. रोशन रामप्रसाद प्रजापती (31 वर्षे) – भगवती नगर, व्यवसाय : कॅटरिंग
2. फौजान आसिफ शेख (22 वर्षे) – ताजबाग, व्यवसाय : डिलिव्हरी
3. पियुष अंता दुधनकर (26 वर्षे) – गजानन नगर, व्यवसाय : इलेक्ट्रिशियन
4. अमित ओमेश ठाकरे (32 वर्षे) – पिपळा फाटा, व्यवसाय : हॉटेल/सावजी रेस्टॉरंट

या सर्वांविरोधात अपराध क्र. 263/2026 नोंद करण्यात आला असून कलम 316(2), 318(4) (BNSS) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांची तात्काळ कृती

या गुन्ह्यांचा तपास म. पो. उप. आयुक्त श्री रश्मिता राव एन , तसेच सह पोलीस आयुक्त श्री नरेंद्र हिवरे सो. अजनी विभाग नागपूर शहर यांचे मार्गदर्शनात वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनामिका मिर्झापुरे पोलीस ठाणे हुडकेश्वर यांच्या देखरेखीखाली करण्यात आला.सपोनी पपीत रामटेके, उपनिरीक्षक पंकज जाधव, पो.हवा बजरंग जुंगारे, पो.सतीश माने, पो.नरेंद्र थूल , पो.गौरव गजबिये यांच्या पथकाने या प्रकरणात महत्त्वाची भूमिका बजावली.

शहर पोलिसांकडून आवाहन

नागपूर शहरात ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार वाढत असताना पोलिसांनी नागरिकांना सावधानतेचा इशारा देत अनोळखी व्यक्तींना OTP, बँक तपशील, UPI माहिती देऊ नका, असे आवाहन केले आहे.

**निष्कर्ष**

हुडकेश्वर पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेने ऑनलाइन फ्रॉड + चोरी अशा दोन गंभीर गुन्ह्यांचे पर्दाफाश झाले असून आरोपी आता पोलिसांच्या ताब्यात आहेत. पुढील तपास सुरु आहे.

# जिल्हा परिषद शाळा श्रीरामनगर येथे मुलींना स्वसंरक्षणाचे धडे

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा श्रीरामनगर येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत मुलींना स्वसंरक्षणासाठी आत्मनिर्भर बनवण्यासाठी कराटे प्रशिक्षण सुरू करण्यात आले.. याप्रसंगी ग्रामसेविका आम्रपाली देसाई शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संतोष गाजरे, उपाध्यक्ष तुषार शिंदे, मुख्याध्यापक



शशांक पगार, उपशिक्षिका मनिषा सांगळे, मार्गदर्शक प्रशिक्षक विलास गायकवाड उपस्थित होते.कार्यक्रम प्रसंगी ग्रामसेविका आम्रपाली देसाई यांनी विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक व प्रत्येक मुलीने डोळे उघडे ठेवून आपल्यावर होणाऱ्या अत्याचाराच्या घटना आपल्या घरातल्या किंवा जवळच्या व्यक्तींना सांगाव्यात व मन मोकळे करावे त्यामुळे खूप अनर्थ टळतील असे मत ग्रामसेविका आम्रपाली देसाई यांनी व्यक्त केले.

नाशिक जिल्ह्यातील जास्तीत जास्त व तालुक्यातील ग्रामीण भागातील गावागावात जाऊन मुलींना व महिलांना स्वसंरक्षणाचे धडे देण्याचे विलास गायकवाड यांचा मानस आहे

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक शशांक पगार, उपशिक्षिका मनिषा सांगळे, यानी उपक्रमासाठी व शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.यावेळी गावचे सरपंच, उपसरपंच, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या अभियानात राबविण्यात आलेल्या नाविण्यपूर्ण उपक्रमाबाबत माजी सरपंच भिमराज काळे, रावसाहेब गोळे, संपत खताळे, रविंद्र शिंदे यांनी कौतुक केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनिषा सांगळे यांनी केले. विलास गायकवाड यांचे प्रशिक्षणार्थीना मार्गदर्शन लाभत आहे.

# सणसर भवानीनगर येथे डॉक्टरांच्या उपस्थितीत श्रीमती उषा घोरपडे यांचा वाढदिवस साजरा

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय :** सणसर भवानीनगर येथील डॉ. सुशील घोरपडे यांच्या मातोश्री श्रीमती उषा घोरपडे (जगदाळे) यांनी दि.२एप्रिल रोजी वयाची ७६ वर्षे पूर्ण करून ७७ व्या वर्षात पदार्पण केले.या आनंददायी प्रसंगी सणसर भवानीनगर येथील सर्व डॉक्टरांनी एकत्र येऊन सहकारी डॉ.सुशील घोरपडे यांच्या मातोश्रींचा वाढदिवस साजरा केला. कार्यक्रमात श्रीमती उषा घोरपडे यांनी भगवदगीता ग्रंथाचे वाटप करून तसेच उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले.शिक्षण क्षेत्रात त्यांनी प्राथमिक शिक्षिका म्हणून कार्य करताना असंख्य विद्यार्थ्यांची



जडणघडण केली आहे. त्यांच्या कार्यकाळातील योगदानामुळे गावातील शैक्षणिक वातावरण समृद्ध झाले आहे. या वाढदिवस सोहळ्याचे आयोजन डॉ. सुशील घोरपडे, संतोष घोरपडे व गणेश घोरपडे यांनी केले.उपस्थित डॉक्टरांनी त्यांना शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

# ...आणि सभागृहात गोंधळ घालण्याचा कुटील डाव उधळला

## ■ पाणी नियोजनासंदर्भात पाणी परिषद घेणार - महापौर नितीन पाटील
## ■ लघुकाळासोबत दीर्घकालीन उपाययोजनांवर भर दिला जाणार



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** सभागृहात नगरसेवक-नगरसेविकांना आपले विषय मांडण्याचा आणि चर्चेत सहभागी होण्याचा अधिकार असतो.मात्र सभागृहात बोलण्याऐवजी या ठिकाणी विरोधी पक्षाने वेगळी कुटील रणनीती आखून सभागृहाच्या प्रेक्षक गॅलरीत नागरिकांना फलकासह बसवले होते. विशेष म्हणजे हे सर्व नागरिकांसाठी विशेष बसची व्यवस्था करण्यात आली होती. आणि तशी चर्चा प्रेक्षक गॅलरीत ऐकायला मिळत होती. वास्तविक लोकप्रतिनिधी म्हणून सभागृहात नगरसेवक आपले म्हणणे मांडत असतात मात्र विरोधी पक्षाने आपली निष्क्रियता झाकून टाकण्यासाठी नागरिकांना आणण्याची चर्चाही रंगली होती. सभागृहात प्रेक्षक गॅलरीतून गोंधळ होण्याची शक्यता लक्षात आल्याने महापौर नितीन पाटील यांनी तात्काळ सभागृहाच्या कामकाजाला छेद घालण्याच्या आणि हीन राजकारणाबद्दल विरोधकांवर ताशेरे ओढले. सभागृहात शिस्तबद्ध योग्य प्रकारे कामकाज होणे अपेक्षित आहे याठिकाणी लोकप्रतिनिधींना आपले म्हणणे मांडण्याचे अधिकार असते त्यामुळे नागरिकांनी आपले काही म्हणणे असेल तर महापालिका प्रशासन कार्यालयात निवेदन द्यावे हि महासभा असल्याने फलक दाखवणे निदर्शने करणे घोषणाबाजी करणे संयुक्तिक नाही, अन्यथा तसे केल्यास कारवाई करण्यात येईल असे निर्देश दिले. त्यामुळे विरोधकांकडून आलेल्या नागरिकांनी हळहळू प्रेक्षक गॅलरीतून पाय काढला. तीन वर्षांच्या प्रशासकीय कालावधीनंतर सार्वत्रिक निवडणुकीनंतर झालेल्या या महासभेत नागरिकांच्या प्रश्नांना न्याय देण्याच्या भूमिकेतून वाटचाल करण्याची गरज असताना विरोधी पक्षाकडून पाणी प्रश्नाचे स्वार्थी राजकारण करण्यात आले. मात्र विरोधी पक्षाचा गोंधळ घालण्याचा कुटील डाव महापौर नितीन पाटील यांनी उधळून लावला. त्याचबरोबर पाणी प्रश्न हा आमच्या जिव्हाळ्याचा आहे, त्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला देऊन येत्या पंधरा दिवसात विशेष सभेतुन पाणी परिषद घेणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. तसेच पाणी पुरवठा योग्य होईपर्यंत बिल्डरांचे पाणी कनेक्शन बंद करण्याच्याही सूचना त्यांनी यावेळी प्रशासनाला केली.

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, नगर विकास सचिव, सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बाल कल्याण सभापती ममता म्हात्रे, नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी उपस्थित होते. दरम्यान अर्धा तास चर्चेत पाणी प्रश्नावर चर्चा झाली. यामध्ये नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, ॲड. मनोज भुजबळ, प्रवीण पाटील, रामदास शेवाळे, अजय बहिरा, अमर पाटील, विजय खानावकर, लतीफ शेख व इतर नगरसेवकांनी या चर्चेत सहभाग घेतला. त्यांनी आपापल्या भागातील पाण्याची स्थिती मांडतानाच उपाययोजनासंदर्भात चर्चा केली. डॉ. अरुणकुमार भगत यांनी पनवेलच्या पाणी पुरवठ्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी न्हावाशेवा टप्पा योजनेचा सातत्याने पाठपुरावा केल्याचे नमूद करून दरमहा त्याचा आढावा ते घेत असल्याचे नमूद केले.

सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार यांनी यावेळी सभागृहात माहिती देताना सांगितले कि, पनवेल महापालिकेची पहिली सार्वत्रिक निवडणूक २०१७ साली झाली. त्यानंतर मुदत संपल्यावर गेली तीन वर्षे प्रशासक होते. पनवेल महापालिका हद्दीतील पाणी पुरवठा संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्य शासन आणि प्रशासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरूच ठेवला आहे. संबंधित विभागाचे मंत्री, अधिकारी यांच्यासमवेत नियमित बैठका घेतल्या आहेत. पाण्याचे स्रोत देहरंग धरण, एमजेपी, सिडको कडून पाणी पुरवठा होत असतो. पुढील २५ वर्षांचा विचार करून आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्य शासनाकडे पाठपुरावा केला, त्या अनुषंगाने शिलार धरण प्रकल्प उभारला जाणार आहे. तसेच या प्रकल्पाचा भुर्दंड महापालिकेवर येऊ नये यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. त्यामुळे फक्त शॉर्ट टर्म नाही तर लॉन्ग टर्मचा विचार करून उपाययोजना केली जात आहे, असेही ॲड. प्रकाश बिनेदार यांनी अधोरेखित केले. आयुक्त मंगेश चितळे यांनी सभागृहाला माहिती देताना सांगितले कि, पनवेल महापालिकेला दरदिवशी २५८ एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे. सध्या २१८ एमएलडी पाण्याचा पुरवठा होत आहे. पाणी पुरवठा संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी वारंवार शासन स्तरावर बैठका घेऊन योग्य त्या उपाययोजनांच्या बाबतीत पुढाकार घेतला आहे. सन २०५१ ला प्रतिदिन ५०० एमएलडी पाणी लागेल त्या अनुषंगाने शिलार धरणाचे नियोजन करण्यात आले आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाणी पुरवठ्यासंदर्भात ऑटोमेशन करण्यासाठी पाठपुरावा केला असून त्या अनुषंगाने सिडकोने टेंडर काढले आहे. त्यामुळे पाणी पुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

पाणीपुरवठ्यासारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर राजकारण न करता सर्वांनी एकत्र येऊन सकारात्मक सहकार्य करणे गरजेचे आहे. एकूणच पाणी पुरवठा जिव्हाळ्याचा प्रश्न मानून सत्ताधारी पक्ष काम करत आहे. आणि त्या अनुषंगाने उपाययोजना करत असल्याचे जाहीर आहे. सहकार्य करण्याऐवजी त्यामध्ये खोडा घालण्याच्या दृष्टीने विरोधी पक्ष युक्त्या करत आहे. असेच चित्र या महासभेच्या अनुषंगाने पहायला मिळाले.

---

# मतदारसंघाच्या विकासासाठी खासदार संजय देशमुख यांनी टोलबंदी,रस्ते सुधारणा आणि पोहरादेवी–माहूर गड विकासासाठी घेतली केंद्रीय मंत्री श्री .नितीन गडकरी यांची भेट



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी वाशिम गजानन पवार :** लोकसभा खासदार श्री.संजय देशमुख यांनी केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्री श्री.नितीन गडकरी साहेब यांची भेट घेतली आणि वेगवेगळ्या विषयासाठी निवेदन देण्यात आले.सर्वप्रथम खासदार संजय देशमुख यांनी राष्ट्रीय महामार्ग 361C वरील दारव्हा तालुक्यातील भांडेगाव येथे सुरू करण्यात आलेल्या टोल नाक्याचा मुद्दा उपस्थित केला.याच मार्गावर अवघ्या 45 किलोमीटर अंतरावर खेरडा बुद्रुक येथे आधीच एक टोल नाका कार्यरत असताना, नवीन टोल नाका सुरू करणे हे राष्ट्रीय महामार्ग शुल्क नियमांचे स्पष्ट उल्लंघन असल्याचे त्यांनी सांगितले. या दुहेरी टोल वसुलीमुळे स्थानिक नागरिक, शेतकरी, व्यापारी तसेच दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून नियमबाह्य असल्यास संबंधित टोल नाका तत्काळ बंद करण्यात यावा, अशी त्यांनी मागणी केली.

यासोबतच त्यांनी वाशिम जिल्ह्यातील श्री क्षेत्र पोहरादेवी व नांदेड जिल्ह्यातील माहूर गड या अत्यंत महत्त्वाच्या धार्मिक स्थळांच्या विकासाचा मुद्दाही मांडला. पोहरादेवी हे बंजारा समाजाचे प्रमुख श्रद्धास्थान असून देशभरातून मोठ्या संख्येने भाविक येथे येतात. तसेच माहूर गड येथील देवी मंदिर हे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक प्रमुख शक्तिपीठ असून विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रातील असंख्य कुटुंबांचे कुलदैवत आहे.

या दोन्ही तीर्थस्थळांचा विकास करण्यासाठी केंद्र सरकारच्या 'प्रसाद' (Pilgrimage Rejuvenation and Spiritual, Heritage Augmentation Drive) योजनेत समावेश करण्यात यावा, अशी त्यांनी मागणी केली.

यासाठी केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्याकडे विशेष शिफारस करण्याची विनंती त्यांनी संबंधित मंत्रालयाकडे केली आहे.

तसेच पोहरादेवीकडे जाणाऱ्या सिंगद–पोहरादेवी व पंचाळा –पोहरादेवी या महत्त्वाच्या मार्गांची सध्याची दयनीय अवस्था लक्षात घेता, या रस्त्यांचे तात्काळ रुंदीकरण व मजबुतीकरण करण्याचीही त्यांनी मागणी केली. वाढत्या भाविक संख्येमुळे सुरक्षित आणि सुकर प्रवासासाठी हे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

खासदार संजय देशमुख यांच्या या मागण्यांमुळे विदर्भातील धार्मिक पर्यटनाला चालना मिळून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल, तसेच भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील,असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

---

# वृक्षलागवडीसाठी वृक्षक्रांती मिशनला सहकार्य करण्याचे जिल्हाधिका–यांचे निर्देश !!



**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी**

**अकोला :** वृक्षक्रांती मिशनतर्फे 'स्वस्तिक पॅटर्न'मध्ये संपूर्ण जिल्ह्यात वृक्षलागवडीचा प्रस्ताव असून, त्यांना सर्व यंत्रणांनी सहकार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी सर्व यंत्रणांना दिले आहेत.

मिशनचे संस्थापक ए. एस. नाथन यांच्यातर्फे 'स्वस्तिक पॅटर्न'मध्ये वृक्षलागवडीचा उपक्रम अनेक वर्षांपासून राज्यात ठिकठिकाणी राबविण्यात येत आहे. अकोला जिल्ह्यातील ६० शासकीय कार्यालये व जागांमध्ये या उपक्रमात वृक्षलागवड झाली. यंदाही हा उपक्रम राबविण्याची इच्छा असून, जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालये, ई-क्लास जमीनीवर, तसेच एमआयडीसीच्या खुल्या जागांवर स्वस्तिक वृक्षलागवडीसाठी नि:स्वार्थ सेवा देण्याची तयारी आहे, असे श्री. नाथन यांनी प्रस्तावात नमूद केले आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील वृक्षलागवडीला चालना मिळण्यासाठी कार्यालयातील जागा, पाण्याची व्यवस्था, रोपे, कुंपण, यंत्रसामग्री आदी बाबींसाठी यंत्रणांनी मिशनला सहकार्य करावे. वृक्षलागवडीसाठी मनरेगाअंतर्गत रोपवाटिकेतून विभागीय वनाधिकारी, सामाजिक वनीकरण विभागातर्फे विनामूल्य रोपे उपलब्ध करून द्यावी. जिल्ह्यात वृक्षलागवडीला चालना द्यावी, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले आहेत.

---

# विधानपरिषद आ. तथा माजी खा. भावनाताई गवळी यांची पळसखेड येथे सदिच्छा भेट

## ब्रम्हांडनायक पेट्रोल पंपावर सत्कार; शिवसैनिकांची उत्स्फूर्त उपस्थिती



**दैनिक युवक आधार**

**वाशिम जिल्हा प्रतिनिधी**

**करण धोंगडे :** पळसखेड येथे विधानपरिषद आमदार तथा यवतमाळ–वाशिम लोकसभा मतदारसंघाच्या अपराजित माजी खासदार आणि शिवसेना नेत्या भावनाताई गवळी यांनी ब्रम्हांडनायक पेट्रोल पंपाला सदिच्छा भेट देत स्थानिक नागरिकांशी संवाद साधला. त्यांच्या या भेटीमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.या प्रसंगी पंपाचे मालक पुंजाजी पाटील खरात यांनी भावनाताई गवळी यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी त्यांनी स्थानिक पातळीवरील विविध प्रश्न, विकासकामांची स्थिती तसेच नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर प्राधान्याने तोडगा काढण्याचे आश्वासन त्यांनी दिले.कार्यक्रमाला शिवसेना तालुकाप्रमुख मच्छिंद्र पाटील ढोणे, ओबीसी तालुकाप्रमुख गजानन पाटील गव्हाणे, शेषराव पाटील खरात, संदीप पाटील खरात यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पक्ष संघटन अधिक बळकट करण्यावर भर देण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. भावनाताई गवळी यांच्या या सदिच्छा भेटीमुळे स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून आगामी काळात विकासकामांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

---

# गावची शाळा, आमची शाळा ; गावकर्यांच्या मदतीतून उभे राहणार विद्यार्थ्यांचे भविष्य ; शिक्षकांची कौतुकस्पद कामगिरी



**दैनिक युवक आधार**

**कळमनुरी : नर**वाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रगतीसाठी गावकऱ्यांनी एकजुटीचे दर्शन घडवत लोकसहभागाच्या माध्यमातून मोलाची मदत केली आहे. शासनाच्या निधीची वाट न पाहता, आपल्या गावातील मुलांचे भविष्य उज्ज्वल व्हावे या उद्देशाने गावकऱ्यांनी एकत्र येऊन शाळेला शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

शाळेची पटसंख्या आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षक सातत्याने प्रयत्नशील आहेत. मात्र, काही भौतिक सोयीसुविधांची कमतरता भासत होती. ही बाब लक्षात घेऊन शाळा व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थांची विशेष बैठक पार पडली. या बैठकीत गावकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे मदतीचा हात पुढे केला.

मिळालेली मदत व विकासकामे:

गावकऱ्यांच्या या योगदानातून शाळेत अनेक सुविधा पूर्ण करण्यात आल्या आहेत:

पिण्याच्या पाण्याची सोय: शाळेत वॉटर टाकी बसवण्यात आली.

रंगरंगोटी: बोलक्या भिंती आणि आकर्षक रंगरंगोटीमुळे शाळेचा परिसर सुशोभित झाला आहे.

क्रीडा साहित्य: मुलांच्या शारीरिक विकासासाठी विविध खेळांचे साहित्य आधीच उपलब्ध असल्यामुळे त्याचाही फायदा मुलांना होतं आहे

शाळेसाठी गावातील दानशूर व्यक्ती, व सर्व च गावकरी यांनी देखील आर्थिक व श्रमदान स्वरूपात मोठे योगदान दिले आहे. "शाळा ही गावाची अस्मिता आहे आणि तिच्या प्रगतीत आमचा वाटा असणे हे आमचे कर्तव्य आहे," अशी भावना यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केली. शाळेच्या मुख्याध्यापकांनी आणि शिक्षक वृंदाने सर्व गावकऱ्यांचे आभार मानले असून, या लोकसहभागामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला असल्याचे सांगितले. परिसरातील इतर गावांसाठी हा उपक्रम एक आदर्श ठरत आहे.

---

# केरळ विधानसभा निवडणुकीत नागपूरच्या भाजप नेत्यांचा झंझावात

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी :** भारत निवडणूक आयोगाने केरळ विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या नुसार प्रचाराला सुरुवात झालेली आहे, संपूर्ण राज्यामध्ये ९ एप्रिल रोजी मतदान आणि ४ मे रोजी निकाल घोषित केले जाणार आहेत. केरळच्या १४० विधानसभा जागांसाठी होणाऱ्या या रणधुमाळीत सत्ता मिळवण्यासाठी भारतीय जनता पक्षाने आपली संपूर्ण ताकद पणाला लावली आहे. या पार्श्वभूमीवर, नागपूरमधील भाजपच्या अनेक दिग्गज नेत्यांकडे केरळमधील महत्त्वाच्या मतदारसंघांची जबाबदारी सोपवण्यात आली असून, हे सर्व नेते सध्या केरळमध्ये पूर्णवेळ ठाण मांडून बसले आहेत.महाराष्ट्रातील ८७ नेते १४० पैकी ८१ विधानसभा क्षेत्रात आपलं निवडणूक कौशल्य पणाला लाऊन पूर्णवेळ काम करत आहेत,पक्षाने दिलेल्या जबाबदारीचे पालन करत नागपूरचे नेते आपापल्या नियुक्त विधानसभा क्षेत्रात प्रचाराचा धडाका लावत आहेत. यामध्ये मध्य नागपूरचे आमदार प्रवीण दटके हे तिरुवनंतपुरम जिल्ह्यातील 'कझकूटम' विधानसभा मतदारसंघात प्रचाराची धुरा सांभाळत आहेत. माजी आमदार अनिल सोले यांच्याकडे 'नेयाट्टीनकारा' विधानसभा क्षेत्राची जबाबदारी देण्यात आली आहे, तर माजी आमदार गिरीश व्यास हे 'नेमम' विधानसभा मतदारसंघात सक्रियपणे कार्य करत आहेत. तसेच आमदार परिणय फुके हे 'पुनजर' विधानसभा मतदारसंघात पूर्णवेळ उपस्थित राहून प्रचाराचे सूक्ष्म नियोजन आणि संघटन बांधणीवर भर देत आहेत.नागपूरच्या या अनुभवी नेत्यांनी केरळमधील स्थानिक कार्यकर्त्यांच्या साथीने जनसंपर्क मोहिमा आणि प्रचार सभांचा धडाका सुरू केला आहे. सोबतच विदर्भातील आर्वी विधानसभा चे आमदार सुमित वानखेडे,गडचिरोली चे आमदार मिलींद नरोटे,वरोरा चे आमदार करण देवतळे,चिखली चे आमदार श्वेता महल्ले,अकोला चे आमदार रणजीत पाटील,धामणगाव रेल्वे चे आमदार प्रताप अडसड विविध विधानसभा सभेत पक्षाने दिलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत, केरळमध्ये भाजपची सत्ता आणण्यासाठी हे सर्व नेते दिवस-रात्र मेहनत घेत आहेत. नागपूरच्या या नेत्यांच्या सक्रिय सहभागामुळे केरळमधील भाजपच्या प्रचाराला मोठी गती मिळाली असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.सर्वांच्या परिश्रमा मुळे व केरळ मधील जनतेच्या सहकार्याने भाजपाला या वेळी नेत्रदिपक यश मिळेल या बाबत खात्री आहे.



# नवी मुंबईतील ऑर्केस्ट्रा बार बंद हॉटेल चालक-मालक हैराण

## मुंबईसह उपनगरामध्ये ऑर्केस्ट्रा बार चालू मग नवी मुंबई साठी कायदा वेगळा का?

### साहेब पाठीवर मारा पोटावर नको अशी हॉटेल चालकांची आर्त हाक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** नवी मुंबईतील सर्व्हिस बार आणि ऑर्केस्ट्रा बारचा मुद्दा आता सर्वत्र गरमागरमीचा झालाआहे. सर्व परवानगी घेऊन चालू असणारी हॉटेल अचानक बंद पडल्यामुळे याचा परिणाम नवी मुंबईतील हॉटेल उद्योगासह,ओला वाहक, रिक्षा चालक तसेच रात्रीं उशिरा चालणाऱ्या पान टपऱ्या सह बुरजी पाव तीच चहा वाले यांच्यापर्यंत पडला आहे. नवी मुंबईतील 23 फेब्रुवारी पासून ऑर्केस्ट्रा बार पूर्णपणे बंद ठेवण्यात आले. हे कोणत्या नियमाला धरून ना कोणती लिखित ऑर्डर ना महाराष्ट्र सरकारचा फतवा. शिवसेना नेते भास्कर जाधव यांनी अधिवेशनात पनवेल येथील रस्त्या कडील बारचा लखलखीत बार गोंगाट ,वाहतूक अडथळा अशी मांडणी केली. अधिवेशनात बारचा उल्लेख करताच हिकडं नवी मुंबई पोलिस दलात खळबळ उडाली. कोणती ही लेखी ऑर्डर न काढताच नवी मुंबईतील बार बंद करण्याचा अलिखित फतवा निघाला.

नवी मुंबईतील सर्व्हिस बार तसेच ऑर्केस्ट्रा बार यांना परवानगी देत असताना महिला नोकर नामा हे राज्य उत्पादन शुल्क कार्यालय शासकीय चलन भरून घेऊन परवाना देत असते. राज्य उत्पादन शुल्क आणि विभागीय स्तरावरील सर्व परवानगी घेऊन ही व्यवसाय चालू होते. मग ते बेकायदेशीर कसे?हा प्रश्न हॉटेल चालक मालक उपस्थित करत आहेत. मुळात सर्व प्रकारची परवानगी घेऊन चालू असणारे सर्विस बार तसेच ऑर्केस्ट्रा बार हे नेहमी अधिवेशन काळात बंद का होतात ?.हॉटेल बंद आहेत. मग परवाना नूतनीकरण करायचा कसा? हा प्रश्न हॉटेल चालकाना पडला आहे.

नवी मुंबईतील सर्व्हिस बार तसेच ऑर्केस्ट्रा बार बंद असतानाच याचे उलट महाराष्ट्रात सोलापूर,मुंबई मध्य, मुंबई पूर्व,मुंबई उत्तर तसेच मुंबई उपनगरे,ठाणे जिल्हा असेल त्यामधील मीरा रोड,कल्याण डोंबिवली,उल्हासनगर, सह रायगड जिल्ह्यातील खोपोली रोड वरील असणारे ऑर्केस्ट्रा बार असतील त्यांना सूट का? हा ही प्रश्न नियम होतो .राज्यकर्त्यांना फक्त नवी मुंबईतील सर्व्हिस बार तसेच ऑर्केस्ट्रा बार वरच अधिवेशनात मुद्दा उचलायचा असतो का?असा प्रश्न हॉटेल मालक उपस्थीत करत आहेत.

नवी मुंबईतील किमान 4000 हून अधिक लोक कलाकार नवी मुंबई पोलिस दलाच्या एका निर्णयामुळे बेरोजगार झाले असल्याने दुहेरी

> **रायगड मधील असणारे सर्व्हिस बार तसेच ऑर्केस्ट्रा बार यांना दारू विक्री परवानगी नोकर नामासह दिली असून बार बंद करा अथवा नोकर मनामधील कामगाराना काढून टाका असे कोणते ही आदेश राज्य उत्पादन कार्यालयाकडून दिले गेले नाहीत. दारू विक्री चालू ठेवण्यास आमची हरकत नाही.**
>
> **- रविकिरण कोल्हे,**
> **अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क विभाग रायगड**

धोरणाचा आरोप होत आहे. कोणत्या ही शासकीय यंत्रणेकडून लेखी खुलासा नाही बंद का ? मग "फक्त नवी मुंबईतून जाताना नेतेमंडळींना ऑर्केस्ट्रा बार दिसतात का? हा सवाल चालक मालक उपस्थित करत आहेत. महाराष्ट्र शासनाने नियमानुसार परवानगी दिलेली असतानाही नवी मुंबईतील सर्व बार अनेक दिवसांपासून बंद आहेत. यामुळे बारमधील कामगारांवर उपासमारीची वेळ आली असून त्यांच्या कुटुंबांपुढे गंभीर आर्थिक संकट उभे राहिले आहे. नवी मुंबईतील सर्व ऑर्केस्ट्रा बार प्रत्येक हॉटेल मागे परवानगीच मुळात लाखो रुपये भरून करमणूक कर म्हणून दिला आहे.सर्व परवानगी ह्या सर्व्हिस बार आणि ऑर्केस्ट्रा बार चालवणाऱ्या मालक लोकांकडे आहेत. मग कारवाईबका ? नवी मुंबई पोलिसांकडून आलेल्या या अलिखित फतव्याचा आणि हजारो लोकांच्या पोटावर टाच येईल असा आदेश काढला कोणी हे ही कळायला उत्तर नाही. दुसरीकडे, बार मालक देखील प्रचंड अडचणीत सापडले असून "कामगारांना पगार द्यायचा कुठून?"राज्य उत्पादन शुल्काची अवाढव्य रक्कम भरायची कशी, का कर्जाचा डोंगर उभा करून हा ही प्रश्न अनुत्तरित राहतो.कायदेशीर आणि सुप्रीम कोर्टाच्या जी आर नुसार चालणारे बार अचानक बंद का?असा सवाल त्यांना पडला आहे. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे हॉटेल चालक मालक अडचणीत आले आहेत.

---

# आष्टी तालुक्यात सौर कृषी पंप योजनेत कोट्यवधींचा 'महाघोटाळा'?

### पात्र शेतकऱ्यांची नावे बाद करून धनदांडग्यांची चांदी; महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा जिल्हाधिकाऱ्यांकडे खळबळजनक तक्रार!

> **"शेतकऱ्यांच्या हक्काच्या योजनेत डल्ला मारणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना सोडणार नाही. हा गरिबांच्या तोंडचा घास हिरावण्याचा प्रकार आहे."**
> **— कैलास दरेकर (जिल्हाध्यक्ष, मनसे, बीड**

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी / मारुती सत्रे :** महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी/पंप योजने'ला आष्टी तालुक्यात भ्रष्टाचाराचे ग्रहण लागल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. काही भ्रष्ट अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी संगनमत करून पात्र शेतकऱ्यांचा हक्क हिरावून घेतल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला आहे. याप्रकरणी मनसेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन सखोल चौकशीची मागणी केली असून, दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

असा झाला 'खेळ': घोटाळ्याचे गंभीर पैलू

निवेदनात नमूद केल्यानुसार, या योजनेत अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन फेरफार करण्यात आले आहेत:

ऑनलाईन सिस्टीममध्ये छेडछाड: पात्र शेतकऱ्यांची नावे ऑनलाईन यादीतून बेकायदेशीरपणे हटवून, ज्यांनी आर्थिक 'तडजोड' केली आहे अशांची नावे घुसडण्यात आली आहेत.

७/१२ उताऱ्यात फेरफार: ३ HP पंपाची पात्रता असताना चक्क ७/१२ उताऱ्यात 'एडिटिंग' करून नियमबाह्य पद्धतीने ५ HP आणि ७.५ HP चे पंप लाटले गेले आहेत.

आरक्षणावर डल्ला: अनुसूचित जाती (SC) प्रवर्गासाठी राखीव असलेल्या कोट्यातील पंप खुल्या प्रवर्गातील धनदांडग्या व्यक्तींना आर्थिक हितसंबंधातून देण्यात आले आहेत.

गरिबांना ठेंगा, श्रीमंतांना प्राधान्य: गरीब शेतकरी कार्यालयाचे उंबरठे झिजवत असताना, पैसे देणाऱ्या लाभार्थ्यांना तातडीने लाभ दिला जात असल्याचा आरोप आहे.

पुराव्यांशी छेडछाड होण्याची भीती; बदल्या थांबवण्याची मागणी

या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून जोपर्यंत उच्चस्तरीय चौकशी पूर्ण होत नाही आणि दोषींवर कारवाई होत नाही, तोपर्यंत संबंधित विभागातील कोणत्याही जबाबदार अधिकाऱ्याची बदली करू नये, अशी मागणी मनसेने केली आहे. बदली झाल्यास पुराव्यांशी छेडछाड होण्याची शक्यता दरेकर यांनी व्यक्त केली आहे.

आंदोलनाचा इशारा

प्रशासनाने या निवेदनाची दखल घेऊन तत्काळ दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत. अन्यथा, महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेच्या वतीने तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा प्रशासनाला देण्यात आला आहे.

---

# ठाण्यात शिव स्वामी फाउंडेशनचा महिला सन्मान सोहळा उत्साहात पार

## स्वाक्षरी मार्गदर्शन शिबिराने वेधले लक्ष

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी :** ठाणे येथील जी. जी. एज्युकेशन सोसायटी ऑफ पॅरामेडिकल सायन्स येथे शिव स्वामी फाउंडेशन मानव हक्क व माहिती अधिकार जनजागृती करणाऱ्या ट्रस्ट चार महिला सत्कार सोहळा नुकताच २९ मार्च रोजी उत्साहात साजरा झाला.जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून घेण्यात आलेल्या या सत्कार सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना शिव स्वामी आदर्श नारी सन्मानाने गौरविण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवर व श्रोत्यांना प्रसिद्ध स्वाक्षरी मार्गदर्शक डॉ शिंगारे यांचे स्वाक्षरी बाबत उत्कृष्ट मार्गदर्शन लाभले.विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या भाविका तिवारी, यशोदा घोडे, शबाना शेख, ॲड नीता जाधव, सविता सोनवणे, कॅड साधना निंबाळकर, विद्या गायकवाड, मोनिका



पाटील, डॉ पल्लवी शिंगारे, शैला मराठे, रंजना तिवारी, अंजली हडवले, स्वप्ना गायकवाड, सुप्रिया येलमकर, उषा राणा, लीना सुर्यवंशी, मीना राजपूत, सुनिता तांबे, साधना बुगले, रंजिता पाटील, ममता अग्रवाल इत्यादी महिलांचा प्रमुख पाहुणे नगरसेविका शितल ढमाले, माजी नगरसेविका शितल आहेर, जी.एस. महानगर बॅंकेच्या संचालिका छाया वाढवणे, इत्यादी मान्यवांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन संस्थापक अध्यक्ष हिरादास सोनावले यांनी त्यांच्या नेहमीच्या शैलीमध्ये केले. त्यांच्या या खास शैलीमुळे कार्यक्रम रंगतदार झाला. कार्यक्रमादरम्यान नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र व ओळखपत्र प्रदान करून त्यांचाही सन्मान करण्यात आला.उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून कार्यक्रमाचे कौतुक करत शिव स्वामी फाउन्डेशन च्या पुढील वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या .हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हिरादास सोनावले,नरेंद्र बबन पाटील, विलास ईश्वर सावंत,राजकुमार गजयसिंग शर्मा, राजेंद्र प्रल्हाद मालवे, ज्ञानेश्वर धुडकू खैरे, जयवंत धर्मा मसणे, डॉ शिंगारे , रामदास दादा वाढवणे, रमेश अमर राऊत,श्रीधर शंकर घुंबरे, अनिल नारायण मोरये आदींनी मेहनत घेतली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

---

# ...अखेर मायाबाईंची मृत्यूशी झुंज संपली; नागपुरात झाले दुःखद निधन ; सोनवाने कुटुंबावर शोककळा

## उमरझरीत लागला अतिरिक्त पोलीस दलाचा बंदोबस्त

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे :** भंडारा -साकोली तालुक्यातील उमरझरी येथील माया रामकृष्ण सोनवाने वय ५० यांची अखेर मृत्यूशी झुंज संपली. त्यांचे ( बुध. ०१ एप्रिल ) ला रात्री १०:४५ वा. नागपुरात दुःखद निधन झाले. याने गोरगरीब सोनवाने कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. शनिवारी २८ मार्चला सकाळी ८ वा. त्या शेतात मिरच्या तोडत असता अचानक वाघाने त्यांवर हल्ला केला होता. प्रथम साकोली व नंतर नागपुरात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. सलग तीन दिवसांपासून मृत्यूशी झुंज देत असलेल्या मायाबाईंची ही झुंज संपली असून त्यांचे दुःखद निधन झाल्याची घटना साकोलीत धडकताच उमरझरीत कोणताही उद्रेक होऊ नये यासाठी पोलीस निरीक्षक एम. पी. आचरेकर यांनी काल गुरुवारी ता. ०२ ला संपूर्ण उमरझरीत परीसरात अतिरिक्त पोलीस दलाचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तर वनविभागाचे सुद्धा वनसुरक्षा कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त तैनात आहे.



उमरझरी येथे माया रामकृष्ण सोनवाने ही महिला शनिवार २८ मार्चला स. ८ वा. आपल्या शेतात मिरच्या तोडत असता अचानक वाघाने त्यांवर हल्ला केला. यात ती अत्यंत गंभीर जखमी झाली. साकोली उपजिल्हा रुग्णालयात तीला दाखल केले. व नंतर नागपुरात उच्च उपचारासाठी हलविण्यात आले होते. इकडे रविवारी २९ मार्चला वेळीच त्या महिलेला उच्च उपचार व आर्थिक मदत मिळाली नाही, यासाठी उमरझरी शिवनटोला तिरोडा राज्यमार्गावर गावकऱ्यांनी पाच तास चक्का जाम आंदोलन केले. शेवटी वन्यजीव संरक्षण अधिकारी घटनास्थळी येत लेखी आश्वासन दिले व पोलीसांच्या मदतीने हे आंदोलन मागे घेतले होते. माया रामकृष्ण सोनवाने हिची नागपुरात मृत्यूशी झुंज सुरू असता अखेर बुध. ०१ एप्रिलला रात्री १०:४५ दरम्यान तीची प्राणज्योत मालवली. ही बातमी काही साकोली सोशल मिडीयावर व्हायरल होताच साकोलीचे पोलीस निरीक्षक एम. पी. आचरेकर यांनी उमरझरी परीसरात जनतेचा कोणताही प्रकारचा उद्रेक होऊ नये व शांतता सुव्यवस्था रहावी यासाठी लाखनी, भंडारा येथून अतिरिक्त पोलीस दलाचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यासोबतच वन विभागाचे वनसुरक्षा कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त सुद्धा ठेवण्यात आला होता. काल ता. ०२ एप्रिलला सायं. ०५ वाजता नागपूरहून रूग्णवाहिकेने माया रामकृष्ण सोनवाने हीचे शव गावी उमरझरीत पोलीस बंदोबस्तात आणन्यात आले व गावकऱ्यांनी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

परीसरात सातत्याने वाघाच्या हल्ल्यांचे सत्र सुरूच असून बुधवार ०१ एप्रिलला सुध्दा शेतात काड्या वेचणा-या आमगांव बुजरूक येथील छाया सुधाकर मुंगमोडे वय ५३ हिच्यावर सुद्धा याच नरभक्षक वाघाने हल्ला करून गंभीर जखमी केले आहे. या महिलेला सुद्धा उपचारासाठी नागपुरात दाखल करण्यात आले आहे. सदर नरभक्षक वाघाला जेरबंद करून दुरवरील वन्यजीव संरक्षण क्षेत्रात सोडण्यात यावे अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. रविवारी उमरझरीत लोकांनी पाच तास चक्का जाम आंदोलन केले त्यात लोकांवर जे गुन्हे दाखल करण्यात आले ते सर्व गुन्हे मागे घेण्यात यावे अशी मागणी सोशल मिडीयातून जोर धरू लागली आहे.

**• गरीब कुटुंबावर शोककळा •**

मायाबाई सोनवाने व पती रामकृष्ण सोनवाने यांची उमरझरीत अर्धा एकर शेती आहे व यावरच परीवाराचा उदरनिर्वाह चालत असे. समोरील महिन्यात त्यांच्या मुलाचे लग्न जुळले होते. शेतात विविध भाजीपाला लाऊन तो विक्रीस नेणे असे काबाडकष्ट करून मुलाच्या विवाहाचे समारंभात सोनवाने कुटूंबिय अगदी आनंदात होते. परंतू शनिवारी ता. २८ मार्चला स. ८ वाजता शेतातील मिरच्या तोडण्यास गेलेल्या मायाबाई सोनवाने हिच्यावर अचानक वाघाने हल्ला करून गंभीर जखमी केले.

तीला नागपुरात हलविले गेले. आणि तीन दिवस सतत मृत्यूशी झुंज देणारी मायाबाई ही ती झुंज हरली आणि तीचे दुःखद निधन झाले. या घटनेनंतर उमरझरी व परीसरात जनतेमध्ये शोकाकुल वातावरण निर्माण झाले आहे.

---

# महेंद्रशेठ घरत यांनी गावोगावी घेतले हनुमानाचे दर्शन

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** हनुमान जयंती जिल्ह्यात गुरुवारी उत्साहात साजरी करण्यात आली. कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी पनवेल, उरण तालुक्यांतील जावळे, बामणडोंगरी, उलवे, रांजणपाडा, डोलघर, वहाळ, भोम, पागोटे आदी गावांत हनुमान जयंतीनिमित्त हनुमानाचे दर्शन घेतले. यावेळी त्या त्या गावच्या मंदिर व्यवस्थापनातर्फे महेंद्रशेठ घरत यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "गावोगावी आज जी भव्य मंदिरे दिसत आहेत, त्यांच्यासाठी आपण देणगी स्वरूपात खारीचा वाटा उचलला आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळबाधित गावांच्या मंदिरांसाठी प्रत्येकी १ कोटी रुपये सिडको अधिकाऱ्यांना धारेवर धरून त्यावेळी मंजूर करून घेतले. त्यामुळे उलवे



नोडमधील गावांची भव्य मंदिरे उभी झालेली दिसत आहेत. या मंदिरांच्या उभारणीसाठी त्या त्या गावच्या ग्रामस्थांनी अपार मेहनत घेतलेली आहे. ही भव्यदिव्य मंदिरे उभारण्यात ग्रामस्थांची भूमिका आणि त्यांनी पार पाडलेली जबाबदारी खूप महत्त्वाची आहे. त्यामुळेच आज पालख्या, जत्रा, उत्सव यासांठी मंदिरे सजलेली आहेत. हे पाहून मनाला खूप समाधान वाटते."

---

# प्रदूषणाबाबत कारवाईची मागणी ; उपोषणाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण (प्रतिनिधी): मोहम्मद पिंजारी** : मुरुड ग्रामपंचायत हद्दीत कार्यरत असलेल्या केसरिया ऑइल्स अँड प्लॅस्ट कंपनी लिमिटेड या उद्योगाविरोधात प्रदूषणासंदर्भात कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते पवन भैरू नाडे यांनी ग्रामपंचायत कार्यालयास दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.दि. २३ मार्च २०२६ रोजी सादर केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने ग्रामपंचायत कार्यालयाने संबंधित उद्योगास नोटीस बजावून सात दिवसांच्या आत लेखी स्पष्टीकरण सादर करण्यास सांगितले होते, असे



निवेदनात नमूद करण्यात आले आहे.मात्र, नमूद मुदतीत संबंधित उद्योगाकडून कोणताही लेखी खुलासा प्राप्त झाला आहे काय, याबाबत माहिती देण्यात यावी, तसेच खुलासा सादर न झाल्यास संबंधित उद्योगावर कोणती कारवाई करण्यात आली आहे, याची लेखी माहिती देण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात पुढे नमूद केल्याप्रमाणे, सदर प्रकरणी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचे दिसून येत असून, संबंधित उद्योग पूर्ववत सुरू असल्याचा दावा करण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणी योग्य ती कारवाई न झाल्यास दि. १४ एप्रिल २०२६ पासून आमरण उपोषणास बसण्याचा इशारा देण्यात आला असून, या उपोषणात इतर नागरिकही सहभागी होणार असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.सदर निवेदनाच्या प्रती पर्यावरण मंत्री, जिल्हाधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळ, बीडीओ तसेच पोलिस प्रशासनास पाठविण्यात आल्या आहेत.

# नांदेडमध्ये घरगुती गॅस टंचाईविरोधात वंचित बहुजन आघाडीचे निवेदन

**दैनिक युवक आधार**
**नांदेड (प्रतिनिधी) प्रकाश गवारे :** नांदेड जिल्ह्यात निर्माण झालेल्या घरगुती गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आज जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात एलपीजी, सीएनजी तसेच पेट्रोलच्या टंचाईबाबत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली.



निवेदनात नमूद करण्यात आले की, जिल्ह्यात घरगुती गॅसचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक ठिकाणी गॅससाठी लांबच लांब रांगा लागत असून काही ठिकाणी काळ्या बाजारात गॅसची विक्री होत असल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे गैरमार्गाने घरगुती गॅस विक्री करणाऱ्या एजन्सी धारकांवर व संबंधित व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली.

तसेच नागरिकांना होणारा त्रास टाळण्यासाठी घरगुती गॅसचे घरपोच वितरण प्रभावीपणे राबविण्यात यावे आणि रांगांची समस्या तातडीने सोडवावी, अशी मागणीही आघाडीच्या वतीने करण्यात आली.

या वेळी वंचित बहुजन आघाडीच्या नांदेड उत्तर व दक्षिण शाखेच्या वतीने शासनाचा निषेध व्यक्त करण्यात आला. निवेदन देताना जिल्हाध्यक्ष प्रा. राज आटकोरे, शंकर महाजन, जिल्हा महासचिव दिपक रुद्राजी मगर, रवी भाऊ पंडित, के. एच. वने, यशपाल ढवळे, प्रल्हादराव हिंगोले, संजय टिके, सिद्धांत पवळे, प्रकाश कोल्हे, बालाजी सावंत, अरुण भद्रे, रंगनाथ गजले, विनोद वाघमारे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# नागपूर जिल्ह्यात ई-वाहनांचा 'सुसाट' प्रवास!

- 307 चार्जिंग स्टेशन्सचे जाळे, महावितरणचा पुढाकार
- प्रदूषणमुक्तीकडे जिल्ह्याची वेगाने वाटचाल
- 49 हजार ई-वाहनांना मिळणार जलद चार्जिंगची सुरक्षा

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर :** वाढते प्रदूषण आणि सातत्याने वाढणाऱ्या इंधनाच्या दरामुळे सर्वसामान्यांचा ओढा आता 'इलेक्ट्रिक वाहनांकडे' (EV) वाढला आहे. नागपूर जिल्ह्यात ई-वाहनांच्या वाढत्या संख्येला बळ देण्यासाठी महावितरणने कंबर कसली असून, संपूर्ण जिल्ह्यात 307 सार्वजनिक ई-चार्जिंग स्टेशन्सचे सक्षम जाळे निर्माण केले आहे. यामुळे आता वाहनधारकांना चार्जिंग संपण्याच्या चिंतेपासून मोठी सुटका मिळाली असून जिल्ह्याचा ई-प्रवास अधिक सुखकर झाला आहे.

**49 हजारांहून अधिक वाहने रस्त्यावर:**

पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेला नागपूरकरांनी मोठी पसंती दिली आहे. सध्याच्या आकडेवारीनुसार, जिल्ह्यात एकूण 49 हजार 565 इलेक्ट्रिक वाहने धावत आहेत. ही वाढती संख्या विचारात घेऊन महावितरणने नागपूर जिल्ह्यात पायाभूत सुविधांचा वेग वाढवला आहे. घरगुती विजेवर चार्जिंग शक्य असले तरी, प्रवासादरम्यान किंवा तातडीच्या वेळी 'फास्ट चार्जिंग'ची गरज असते. हीच गरज ओळखून जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात चार्जिंग पॉइंट्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**महावितरणची 'नोडल एजन्सी' म्हणून महत्त्वाची भूमिका:**

राज्य सरकारने इलेक्ट्रिक वाहन धोरणांतर्गत महावितरणला 'नोडल एजन्सी' म्हणून जबाबदारी दिली आहे. नागपूरसह राज्यातील सहा प्रमुख शहरांमध्ये प्रदूषण कमी करण्यासाठी ई-वाहनांचा वापर वाढवणे हे सरकारचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यानुसार, महावितरणकडून चार्जिंग स्टेशन्ससाठी प्राधान्याने वीज जोडणी दिली जात आहे. केवळ स्वतःची स्टेशन्स उभारणेच नव्हे, तर खासगी उद्योजकांनाही या क्षेत्रात उतरण्यासाठी महावितरण तांत्रिक सहकार्य करत आहे.

**विभागावार चार्जिंग स्टेशन्सची उपलब्धता:**

जिल्ह्यातील 307 स्टेशन्सचे जाळे अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पसरलेले आहे यात नागपूर शहर मंडलातील महाल विभागात 84, काँग्रेस नगर विभागात 66, सिव्हील लाईन्स विभागात 45, बुटीबोरी विभागात 40 आणि गांधीबाग विभागातील 17 चार्जिंग स्टेशन्ससह नागपूर ग्रामीण मंडलातील मौदा विभागात 26, सावनेर विभागात 16, काटोल विभागात 7 आणि उमरेड विभागात 6 चार्जिंग स्टेशन्स कार्यरत आहेत.

**'पॉवरअप ईव्ही' ॲप ठरणार सोबती:**

वाहनचालकांना त्यांच्या जवळचे चार्जिंग स्टेशन कुठे आहे, हे शोधण्यासाठी आता वणवण करण्याची गरज नाही. महावितरणच्या 'पॉवरअप ईव्ही' (PowerUp EV) या मोबाईल ॲपमुळे चालक नकाशावर आपल्या जवळचे स्टेशन शोधू शकतात, स्लॉट बुक करू शकतात आणि सुलभपणे चार्जिंग करू शकतात.

**उद्योजकांसाठी मोठी संधी:**

इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन सुरू करू इच्छिणाऱ्यांसाठी महावितरणने प्रक्रिया अत्यंत सुलभ केली आहे. स्वतंत्र वेबसाईटच्या माध्यमातून अर्ज करण्याची सोय उपलब्ध असून खासगी कंपन्या, पेट्रोलियम कंपन्या, गृहनिर्माण संस्था (Housing Societies) आणि वैयक्तिक ग्राहकही यामध्ये सहभाग घेऊ शकतात.

महावितरण यासाठी लागणारी सर्व तांत्रिक मदत पुरवण्यास तत्पर असल्याची माहिती महावितरणतर्फे देण्यात आली आहे.

- उपमुख्य जनसंपर्क अधिकारी,
महावितरण, नागपूर

# जुने माणगाव चौकात गतिरोधकांची तातडीची गरज; अपघातांच्या मालिकेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**दैनिक युवक आधार**
**माणगाव – सचिन पवार** -माणगाव शहरातील वाहतूक कोंडी आणि वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर जुने माणगाव येथील तिनबत्ती चौक पुन्हा एकदा चिंतेचा विषय ठरत आहे. भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे या चौकात दररोज जीव धोक्यात घालून नागरिकांना रस्ता ओलांडावा लागत आहे. काही जण गंभीर जखमी होत आहेत, तर काहींना आपला जीव गमवावा लागत आहे. त्यामुळे या ठिकाणी तात्काळ गतिरोधक बसवावेत, अशी तीव्र मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.



मुंबई-गोवा महामार्गावरील या चौकाची रचना अत्यंत धोकादायक ठरली आहे. काळ नदीच्या पुलानंतर असलेला तीव्र उतार आणि गोव्याच्या दिशेने येताना कोणत्याही प्रकारचे वेग नियंत्रण साधन नसल्याने वाहनांचा वेग अनियंत्रित होतो. परिणामी, क्षणात अपघात घडतात आणि निरपराध नागरिकांना त्याची किंमत जीव गमावून चुकवावी लागते. अनेकदा झालेल्या अपघातांनंतरही संबंधित यंत्रणेकडून दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.गतवर्षी स्थानिक रहिवासी रफिक जामदार या युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर नागरिकांचा संताप अनावर झाला होता. त्यांनी महामार्ग रोखून आंदोलन करत प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला होता. त्या वेळी अधिकाऱ्यांनी गतिरोधक बसवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आजपर्यंत त्या आश्वासनाची पूर्तता झालेली नाही. परिणामी, अपघातांची संख्या कमी होण्याऐवजी वाढतच आहे.

या परिसरातून दररोज हजारो विद्यार्थी शिक्षणासाठी प्रवास करतात. जिल्हा न्यायालय, द. ग. तटकरे महाविद्यालय, अशोक दादा साबळे विधी महाविद्यालय, गीता तटकरे नर्सिंग कॉलेज तसेच विविध माध्यमांच्या शाळा याच भागात असल्यामुळे सुमारे पाच हजार विद्यार्थी या मार्गावरून ये-जा करतात. या लहानग्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. महामार्ग अरुंद असल्यामुळे आणि वाहतुकीचा प्रचंड ताण असल्यामुळे या चौकात सतत कोंडी होत असते. काही वेळा तर वाहनांच्या रांगा किलोमीटरपर्यंत वाढतात. अशा परिस्थितीत एखादा अपघात झाला तर परिस्थिती आणखी भीषण बनते. ज्येष्ठ वकील व विधी महाविद्यालयाचे चेअरमन ॲड. विनोद घायाळ यांनीही या ठिकाणी तातडीने गतिरोधक बसवण्याची गरज अधोरेखित केली आहे.सध्या काळ नदीवरील नवीन पुलाचे काम सुरू असल्याने वाहतुकीवर अधिक ताण निर्माण झाला आहे. त्यातच या महत्त्वाच्या चौकात कायमस्वरूपी पोलिस बंदोबस्त नसल्याने शिस्तीचा अभाव जाणवतो. तीनबत्ती चौक ते ढालघर फाटा या एक किलोमीटरच्या पट्ट्यात वारंवार कोंडी होत असून नागरिकांना तासनतास अडकून पडावे लागत आहे.या सर्व पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिक, विद्यार्थी आणि पालकांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे—जर तात्काळ गतिरोधक बसवले नाहीत, तर आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल.आज गरज आहे ती केवळ आश्वासनांची नव्हे, तर तातडीच्या कृतीची. कारण प्रत्येक दिवसासोबत एखाद्या निष्पाप जीवाचा प्रश्न या चौकात उभा राहत आहे. प्रशासनाने वेळेत निर्णय घेतला, तर अनेकांचे जीव वाचू शकतात—अन्यथा ही वेदनादायी साखळी कायम राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

# सोयगावात भैरवनाथ महाराज यात्रा उत्सव उत्साहात ; बारा गाड्यांची मिरवणूक ठरली आकर्षण

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** सोयगाव शहराचे ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज यांच्या यात्रा उत्सवाचा सोहळा चैत्र शुद्ध पौर्णिमेनिमित्त मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त मंदिर परिसरात दिवसभर भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. श्री भैरवनाथ महाराजांची स्वयंभू लोण्याची मूर्ती हे या यात्रेचे मुख्य वैशिष्ट्य असून परिसरात असे मंदिर दुर्मीळ मानले जाते. मराठवाडा व खानदेशातून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी उपस्थित राहिले होते.यात्रेची सुरुवात दुपारी बारा वाजता महाआरतीनंतर झाली. यावेळी पारंपरिक बारा गाड्यांची भव्य मिरवणूक शहरातून श्री भैरवनाथ मंदिराकडे काढण्यात आली. नंतर बारा गाड्या ची सुरुवात करण्यात आली.लहान मुलांच्या कमरेला नाळ बांधून गाड्या ओढण्याची प्रथा आज



पण सुरू आहे व उत्साहात पार पडली.तसेच अनेक भाविकांनी डाळ-बट्टीचा नवस अर्पण करून आपली श्रद्धा व्यक्त केली. या मिरवणुकीत शहरातील मान्यवर,प्रतिष्ठित नागरिक तसेच मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले होते. यात्रा उत्सवाचे अध्यक्ष दिलीप बिर्ला व त्यांच्या सहकाऱ्यांनी आयोजनाची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली. बारा गाड्यांचे नियोजन नगरसेवक अक्षय काळे व राजु भाऊ दुतोंडे,बंटी काळे, संतोष बोडखे, किशोर मापारी,दिपक पगारे,रोफ काळु यांनी केले,तर वगदा मिरवणुकीचे नियोजन समाजभूषण विष्णू मापारी व नरेंद्र गुजर,अमोल चौधरी, युट्युब स्टार प्रदीप चौधरी, समाधान काळे त्यांच्या टीमने सांभाळले. पारंपरिक श्रद्धा,उत्साह आणि भक्तीभाव यांचा संगम असलेला हा यात्रा उत्सव सोयगावकरांसाठी विशेष ठरला.यावेळी सोयगाव पोलीस स्टेशनचे पीएसआय गजानन आरेकर तसेच कॉन्स्टेबल अजय कोळी व वाघ यांनी यात्रा उत्सवात कुठल्याही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता....

# पत्रकारावर खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या ठाणेदारांवर निलंबनाची कारवाई करा

## ( महागाव तालुका पत्रकार संघाचा आंदोलनाचा इशारा)

**दैनिक युवक आधार**
**एम डी सूरोशे महागाव/यवतमाळ :** लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारांवर यवतमाळ जिल्ह्यात पोलीस प्रशासनाकडून सूडबुद्धीने कारवाई होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. उमरखेडचे ठाणेदार शंकर पांचाळ यांनी पत्रकार अमित देशमुख यांच्यावर दाखल केलेल्या गुन्ह्याचा निषेध करत, महागाव तालुका पत्रकार संघाने तहसीलदार महागाव यांच्यामार्फत जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देऊन ठाणेदारांवर निलंबन करून फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे.

उमरखेड येथील 'धाडस 007 न्यूज' चॅनलचे पत्रकार अमित देशमुख यांनी उमरखेड तालुक्यातील अवैध धंद्यांचे पितळ पुराव्यासह उघडे पाडले होते. या बातम्यांमुळे संतप्त झालेल्या ठाणेदार शंकर पांचाळ यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करत पत्रकार देशमुख यांच्यावर आयपीसी ३५३ (सरकारी कामात अडथळा) व बीएनएस अंतर्गत खोटा गुन्हा दाखल केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. ही कारवाई निव्वळ सूडबुद्धीने आणि अवैध धंदेवाल्यांना पाठबळ देण्यासाठी केल्याचे पत्रकारांचे म्हणणे आहे.



"जर पत्रकाराने खरोखरच सरकारी कामात अडथळा आणला असेल, तर त्यावेळचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी तात्काळ सार्वजनिक करावे," अशी मागणी पत्रकार संघाने करून सदर फुटेज समोर आल्यास ठाणेदारांचा खोटेपणा उघड होईल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला आहे. केवळ स्वतःचे अपयश झाकण्यासाठी एका पत्रकाराचा आवाज दाबण्याचा हा प्रयत्न असल्याचा संताप व्यक्त होत आहे. ठाणेदार शंकर पांचाळ यांना तातडीने निलंबित करून त्यांची सीआयडी चौकशी व्हावी, पत्रकार अमित देशमुख यांच्यावर दाखल केलेले खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत.,अवैध धंद्यांना संरक्षण देणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली..

या निवेदनाद्वारे प्रशासनाला स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, जर दोषी ठाणेदारावर ठोस कारवाई झाली नाही, तर महागाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने जिल्ह्यातील सर्व पत्रकारांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडले जाईल. पत्रकारांच्या सन्मानाला धक्का लागल्यास निर्माण होणाऱ्या जनक्षोभाला पोलीस प्रशासनच जबाबदार असेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सदर निवेदन नायब तहसीलदार गजानन पराते,पुरवठा निरीक्षक मोहन कोल्हे यांनी स्विकारले.या निवेदनावर महागाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष महेश कामारकर,उपाध्यक्ष किरण नरवाडे,सचिव रमेश देशमुख,मार्गदर्शक रितेशभाऊ पुरोहित,माजी अध्यक्ष संतोष जाधव, रवि कावळे,संजय पाटे,विजय सुर्यवंशी,निलेश नरवाडे,विशाल डहाळे,शेरखान पठाण,संजय नरवाडे,अशोक राऊत ,विलास गावंडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# ६९ वा अखिल भारतीय पोलिस कर्तव्य मेळावा २०२५-२६ नागपूरमध्ये यशस्वी

## महाराष्ट्र पोलिसांनी विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक विभाग :** नागपूर शहर पोलिस आयुक्तालयातर्फे आयोजित "६९ वा अखिल भारतीय पोलिस कर्तव्य मेळावा २०२५-२६" हा मेळावा ३० मार्च ते ०१ एप्रिल २०२६ दरम्यान अत्यंत उत्साहात पार पडला. देशभरातील विविध राज्यांच्या पोलिस दलांनी सहभागी होत अनेक स्पर्धांमध्ये कौशल्याची उत्तुंग पातळी गाठत दमदार कामगिरीची नोंद केली.

संगणक अव्हेअरनेस, क्राइम सीन ॲनालिसिस, फिंगरप्रिंट, सायंटिफिक & IT इन्व्हेस्टिगेशन, इंटरऑप्स टेस्ट अशा एकूण ६ विभागांत स्पर्धा झाल्या.

पहिल्या दिवशी झालेल्या 'कंप्युटर अव्हेअरनेस' स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत बाजी मारली. पोलीस उपनिरीक्षक श्री. एस. ओमप्रकाश (सायबर सेल) आणि उपनिरीक्षक अशोक कुमार (ट्रॅफिक पोलिस) यांना विशेष पुरस्कार देण्यात आले.

तसेच 'इंटरऑप्स टेस्ट' स्पर्धेतही महाराष्ट्राचा संघ अव्वल ठरला. पोलीस उपनिरीक्षक श्री. हरीशराव, श्री. जयप्रकाश गौड, तसेच महिला पोलीस कर्मचारी श्रीमती रुचिका यादव यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.'सायंटिफिक & IT इन्व्हेस्टिगेशन' स्पर्धेत महाराष्ट्राचा बहुमान आणखी उंचावला.



या स्पर्धेमध्ये देशभरातील १६ संघ सहभागी झाले होते. उपनिरीक्षक श्री. ओंकार कुमार (नागपूर) आणि पोलीस निरीक्षक श्री. सोंधे यांनी महाराष्ट्राला सुवर्णपदकाचे यश मिळवून दिले.

**फिंगरप्रिंट आणि फोटोग्राफी विभागातील विजेतोंना विशेष सन्मान**

'फोटोग्राफी—क्लोज टेस्ट' स्पर्धेत लखनौ पोलिस दलातील श्री. टी. जे. नवीन यांनी सुवर्णपदक पटकावले. उपनिरीक्षक जयप्रकाश गौड आणि अक्षय कुमार यांना रौप्य व कांस्य पदके देण्यात आली.

**भव्य पुरस्कार वितरण समारंभ**

मेळाव्याचा समारोप ०१ एप्रिल २०२६ रोजी पार पडला. अतिरिक्त पोलीस आयुक्त, विभागीय पोलीस अधिकारी आणि वरिष्ठ प्रशिक्षकांच्या उपस्थितीत विजेत्या संघांचा सत्कार करण्यात आला.

नागपूर पोलिसांच्या उत्तुंग आयोजनाचे सर्वत्र कौतुक झाले.

**प्रमुख वैशिष्ट्ये :**

महाराष्ट्र पोलिसांचा विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय दबदबा

देशभरातील पोलिस दलांच्या अधिकाऱ्यांची उत्कृष्ट उपस्थिती

आधुनिक तपास पद्धती, तांत्रिक कौशल्य आणि फॉरेन्सिक ज्ञानाला चालना

नागपूर पोलिसांची शिस्तबद्ध, भव्य आणि यशस्वी यजमानकी.

# गोकुंद्यातील गॅस एजन्सीवर बेकायदेशीर व्यवहाराचा आरोप; चौकशीची मागणी तीव्र

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी विशाल** : किनवट तालुक्यातील गोकुंदा येथे कार्यरत असलेल्या गॅस एजन्सीच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. संबंधित एजन्सीची अधिकृत मंजुरी सारखणी (ता. किनवट) येथे असताना, शासनाच्या नियमांनुसार ज्या ठिकाणी मंजुरी आहे त्याच ठिकाणी गॅस सिलेंडरचा व्यवसाय करणे बंधनकारक असताना, प्रत्यक्षात मात्र ही एजन्सी सारखणी व गोकुंदा(किनवट )येथे व्यवहार करत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे हा प्रकार बेकायदेशीर असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

दरम्यान, गोकुंदा येथे नागरी वस्तीला लागूनच गॅस सिलेंडर साठवणूक व वितरण केले जात असल्याने सुरक्षेचा प्रश्नही निर्माण झाला आहे. याचबरोबर मागील काही दिवसांपासून गॅस सिलेंडरची तीव्र टंचाई जाणवत असून ग्राहकांना सकाळपासूनच लांबच लांब रांगा लावाव्या लागत आहेत.

सिलेंडर उपलब्धतेतील अनियमिततेमुळे



काळाबाजार होत असल्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना मोठा आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

या सर्व प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच गॅस वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, अशी मागणी किनवट तालुका ग्राहक पंचायतीतर्फे करण्यात आली आहे.

ग्राहक पंचायतीचे अध्यक्ष ॲड. मिलिंद सर्पे आणि सचिव दिलीप पाटील यांनी यासंदर्भात प्रशासनाकडे निवेदन सादर केले आहे.नागरिकांच्या सुरक्षिततेचा व हक्कांचा प्रश्न लक्षात घेता संबंधित यंत्रणांनी तात्काळ हस्तक्षेप करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# दिल्लीत रायगड फडकला!

## खरीवली-चांभार्ली ग्रामपंचातीनी दिली ग्रामविकासाला नवी ऊर्जा

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : जलसमृद्ध खरीवली प्रथम, न्याय्य चांभार्ली दुसरी! रायगडचा डंका दीनदयाळ पुरस्कारात.भारत सरकारच्या पंचायतराज मंत्रालयाने जाहीर केलेल्या प्रतिष्ठित 'दीनदयाळ उपाध्याय पंचायत सतत विकास पुरस्कार'at खालापूर तालुक्यातील खरीवली आणि चांभार्ली ग्रामपंचायतींनी राष्ट्रीय स्तरावर झळाळीने चमकले आहेत. यामुळे रायगड जिल्ह्याचा डंका दिल्लीच्या गल्लीगल्लीतही आता ऐकू येत असून, जिल्ह्यातील ग्रामीण विकासाची नवी लाट उसळली आहे. खरीवली




ग्रामपंचायतीने 'जलसमृद्ध गाव' थीममध्ये देशात प्रथम क्रमांक पटकावला, तर चांभार्लीने 'सामाजिकदृष्ट्या सुरक्षित व सामाजिक न्याय्य गाव' थीममध्ये संयुक्त दुसरा क्रमांक मिळवून घेतला. या यशाने रायगडचा अभिमान वाढला असून, इतर ग्रामपंचायतींना प्रेरणा मिळाली आहे.हा पुरस्कार स्थानिक स्वराज्य संस्थांना शाश्वत विकासाच्या ९ थीम्समध्ये उत्कृष्ट कामासाठी दिला जातो – आरोग्यसंपन्न, दारिद्र्यमुक्त, बालस्नेही, जलसमृद्ध, पर्यावरणस्नेही, पायाभूत सुविधांनी युक्त, सामाजिक सुरक्षित व न्याय्य, सुशासनयुक्त आणि महिलास्नेही गावे. विजेत्या पंचायतींना ५० लाख ते ५ कोटी रुपयांपर्यंतची तरतूद मिळते, जी ग्रामीण विकासासाठीच वापरावी लागते. खरीवलीने जलसंवर्धन, पाणी व्यवस्थापन आणि जलसुरक्षिततेच्या बाबतीत देशभरातील इतर गावांना मागे टाकले. चांभार्लीने सामाजिक न्याय, सुरक्षितता आणि समावेशक विकासात आदर्श निर्माण केला. या दोन्ही ग्रामपंचायतींच्या सक्षम प्रशासनाने पारदर्शकता, जबाबदारी आणि जनकेंद्रित विकासाचे मॉडेल जगासमोर ठेवले आहे.या यशाबद्दल रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) विशाल तनपुरे यांनी खालापूरचे गटविकास अधिकारी संदीप कराडांसह दोन्ही ग्रामपंचायतींच्या प्रशासनाचे कौतुक केले. "हे यश रायगडच्या ग्रामीण विकासाचे प्रतीक आहे. इतर पंचायतींनीही हे उदाहरण घेऊन विकासाच्या नव्या उंची गाठाव्यात," असे वाकडीकर म्हणाले.या पुरस्काराने खरीवली आणि चांभार्लीसारख्या प्रगतीशील गावांना नवी ऊर्जा मिळाली असली, तरी काही ठिकाणी होणाऱ्या भ्रष्टाचाराने लाजिरवाणी वाटली पाहिजे. विकास निधींचा गैरवापर थांबवून पारदर्शकतेने काम करा, अन्यथा अशा यशस्वी गावांची तुलना तुम्हाला कान टोचेल.

रायगडचा हा अभिमान वाढवण्याची जबाबदारी आता सर्वांवर आहे!

# नाशिक जिल्ह्यातील ओढा गावी भैरवनाथ महाराजाचा पालखी सोहळा संपन्न!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (प्रतिनिधी )** : नाशिक जिल्ह्यातील मुक्काम पोस्ट ओढा हे गाव पुरातन युगातील गाव असून या गावात सीतामाईनी लव अंकुश यांना जन्म दिला. याच गावातील पेशवेकालीन सरदार रंगनाथराव ओढेकर यांनी नाशिक येथील काळाराम मंदिर बांधले. परंतु त्यावेळेस दलितांना दर्शनाची परवानगी नव्हती, तेव्हा महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी काळाराम मंदिराचा सत्याग्रह करून ते मंदिर सर्वांसाठी खुले केले.गावात नवसाला पावणारे भव्य दिव्य असे सिद्धिविनायक मंदिर गोदावरी काठावर वसलेले आहे आणि याच ठिकाणी कुंभमेळा होत आहे.ओढा ठिकाणी गोदा घाट तयार होत असून याच ठिकाणी साधुसंतांना शाही स्नान करता येणार आहे. अशी महान ओळख या गावाची असून या गावात दरवर्षीप्रमाणे यंदाही १एप्रिल २०२६रोजी भैरवनाथ महाराजांची भव्य आशी यात्रा साजरी करण्यात आली. हिंदू धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे भैरवनाथाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी ग्रामस्थांनी सोंग मिरवणुकीचा आनंद लुटला. संध्याकाळी करमणुकीचे साधन म्हणून तमाशा ठेवण्यात आला. त्याचाही आनंद गावकऱ्यांनी लुटला. तसेच मुस्लिम बांधवांच्या वतीने व हिंदू बांधवांच्या एकात्मिकतेने मन्सूर शहा बाबा यांचा संदल काढून सर्वधर्म समभाव याचा आदर्श ओढा



गावातील ग्रामस्थांनी जगासमोर एक आदर्श निर्माण करून हम सब एक है हा संदेश जगाला दिला. यात्रेकरिता नाशिक पंचक्रोशीतील भाविकांनी दर्शनाचा व यात्रेचा आनंद लुटला. यासाठी ओढा गावातील सरपंच प्रियाताई पेखळे,उपसरपंच योगेश कापसे,ग्रामपंचायत सदस्य,पोलीस पाटील गजानन भोर, यात्रा कमिटीचे अध्यक्ष बाबुराव पेखळे, उप-अध्यक्ष शंकर पेखळे,खजिनदार मधुकर शिरसाट पंच संपत पेखळे, शंकर देवकर, राजू सहाने, आण्णा गुरव, रामचंद्र पेखळे,तसेच गावातील माजी सरपंच साहेबराव पेखळे, मधुकर पेखळे,निलेश पेखळे, तंटामुक्ती अध्यक्ष बबनराव कंक ,संदल कमिटीचे अध्यक्ष अन्वर सय्यद,अब्बास सौदागर तसेच ओढा गावातील प्रतिष्ठित नागरिक, युवक तसेच यात्रेकरिता नाशिक आडगाव पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य व कायदा सुव्यवस्था व्यवस्थित राबविली त्यामुळेच सर्वांच्या सहकार्याने यात्रा उत्सव संपन्न झाला.

# अवकाळीचा कहर! निफाड पूर्व भागातील शेती उद्ध्वस्त

## कांदा, डाळिंब व द्राक्ष बागांचे मोठे नुकसान; शेतकरी हवालदिल

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी** : एप्रिल निफाड तालुक्याच्या पूर्व भागात आज दुपारी अचानक आलेल्या अवकाळी पावसाने आणि जोरदार वाऱ्याने शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. सुमारे दीड तास सुरू असलेल्या या पावसासोबत काही ठिकाणी तुरळक गारपीट झाल्याने कांदा, डाळिंब व द्राक्ष बागांसह गहू आणि मका पिकांनाही मोठा फटका बसला आहे.देवगाव, कानळद, कोळगाव, वाकद, शिरवाडे, मानोरी, भरवस, वाहेगाव, नांदगाव, डोंगरगाव, धारणगाव, खेडलेझुंगे तसेच विष्णुनगर,विंचूर या भागात वाऱ्याच्या वेगामुळे द्राक्ष बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.



अनेक ठिकाणी द्राक्षांचे घड तुटून जमिनीवर पडले असून उत्पादन आणि गुणवत्तेवर परिणाम झाला आहे.

डाळिंब बागांमध्ये मोठ्या प्रमाणात फळगळ झाली आहे, तर कांदा पिकात पाणी साचल्याने कुजण्याची भीती निर्माण झाली आहे. गहू व मका पिकांनाही या अवकाळी पावसाचा फटका बसून उत्पादनात घट होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. सध्या शेतीचा खर्च वाढलेला असताना वारंवार होणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शेतीतील गुंतवणूक धोक्यात आली असून अनेक शेतकरी हवालदिल झाले आहेत.दरम्यान, बाधित भागात तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी जोरदार मागणी होत आहे. महसूल व कृषी विभागाने तातडीने सर्वेक्षण करून मदत द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# स्थानिक नगरसेवकांच्या पुढाकाराने हापंसा पंपचे काम पूर्ण

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव शहरातील वार्डातील हापंसा, नादुरुस्त होत्या त्यामुळे वार्डातील नगरसेवकांना टिकेची जोड उठत होती. त्यामुळे नागरिकांच्या पाणीपुरवठ्याशी संबंधित अडचणी दूर करण्यासाठी नगर पंचायतने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. वार्ड क्रमांक १,२,३ तसेच वार्ड क्रमांक ५ मधील हापसाची दुरुस्ती यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली आहे.याचबरोबर वार्ड क्रमांक ६ मधील योगेश्वर नगर परिसरात मनगटे यांच्या गिरणीजवळील हापसाही दुरुस्त करण्यात आला आहे.ही कामे महाराष्ट्र राज्याचे मंत्री व आमदार अब्दुल सत्तार



यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.सोयगाव नगर पंचायतच्या नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष आबासाहेब काळे,अल्पसंख्याक विकास महामंडळाचे उपाध्यक्ष बबलू भैय्या,गटनेते अक्षय भाऊ काळे,शिवसेना शहराध्यक्ष, तसेच नगरसेवक संतोष बोडखे, बंटी भाऊ काळे राजु दुतोंडै, कदीर शहा,किशोर मापारी,रोफ काळु,भगवान जोहरे,गजानन कुंडके,दिपक पगारे,आणि इतर सर्व नगरसेवक व कर्मचारी वर्ग यांच्या संयुक्त प्रयत्नांतून हे काम यशस्वी झाले.या दुरुस्तीमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून पाणीपुरवठा सुरळीत होण्यास मदत झाली आहे. या कार्यासाठी सर्व संबंधित मान्यवरांचे नागरिकांकडून मनापासून आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

आबासाहेब काळे यांची प्रतिक्रिया: आबासाहेब काळे यांनी सांगितले की,“सोयगाव शहरातील नागरिकांना स्वच्छ व नियमित पाणीपुरवठा मिळावा, हा आमचा प्राधान्यक्रम आहे. विविध वार्डांतील हापसांच्या दुरुस्तीमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.पुढेही अशा मूलभूत सुविधांवर लक्ष देऊन शहराच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.”

# कॅप क्लबच्या ८ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित क्रिकेट स्पर्धेत तमीम यांच्या संघाचे वर्चस्व; मान्यवरांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)** : कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी परिसरातील 'कॅप क्लब' (Cap Club) च्या ८ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित भव्य 'बॉक्स क्रिकेट टूर्नामेंट' मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत तमीम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन आणि बक्षीस वितरण सोहळा पनवेलमधील विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी मुख्य अतिथी म्हणून जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. प्रीतम म्हात्रे, पनवेल महानगरपालिकेचे माजी महापौर नितीन पाटील, नगरसेवक राजू सोनी आणि नगरसेवक सुमीत झुंजारराव उपस्थित होते. मान्यवरांनी खेळाडूंच्या उत्साहाचे




कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सकाळपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत अनेक नामांकित संघांनी सहभाग नोंदवला होता. अंतिम फेरीत तमीम यांच्या संघाने बाजी मारली, तर हादी यांच्या संघाने उपविजेतेपद पटकावले. संजू यांच्या संघाने तृतीय, तर प्राईम होम्स संघाने चतुर्थ स्थान मिळवले. सर्वच संघांनी शिस्तबद्ध आणि कौशल्यपूर्ण खेळाचे दर्शन घडवत उपस्थितांची मने जिंकली. स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या वैयक्तिक खेळाडूंचाही यावेळी गौरव करण्यात आला. यामध्ये नाईम, कामरान, तरुण, विशाल कारंगुटकर, सईद, अयान आणि हेमंत परब यांना त्यांच्या उत्कृष्ट खेळासाठी ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच स्पर्धेदरम्यान लकी ड्रॉच्या विजेत्यांनाही आकर्षक बक्षिसे प्रदान करण्यात आली. या इव्हेंटच्या यशस्वीतेसाठी आयोजक ॲड. मनोहर सचदेव आणि मनोज देढीया यांनी चोख नियोजन केले होते. दैनंदिन तणावातून मुक्त होऊन खेळाडूंनी या स्पर्धेचा आनंद घ्यावा, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे त्यांनी सांगितले. काजळ देढीया यांच्यासह कॅप क्लबच्या सर्व सदस्यांनी या मेगा इव्हेंटला यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# मानेगाव (सडक) येथे रक्तदान शिबिरातून हनुमान जन्मोत्सव साजरा ;११ रक्तदात्यांचा सहभाग ; सामाजिक बांधिलकीचा आदर्श उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**रोशन खोब्रागडे/ लाखनी तालुका प्रतिनिधी** : मानेगाव (सडक) येथे श्री हनुमान जन्मोत्सव उत्साहात आणि सामाजिक जाणीव जपत साजरा करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यंदाही उन्हाळ्यात भासणारी रक्ताची टंचाई लक्षात घेऊन रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ११ युवकांनी स्वेच्छेने रक्तदान करून समाजासमोर आदर्श निर्माण केला. श्री हनुमान देवस्थान समितीच्या वतीने आयोजित या उपक्रमात भक्ती आणि समाजसेवेचा सुंदर संगम पाहायला मिळाला. रुग्णांना



वेळेवर रक्त मिळावे आणि रक्ताच्या अभावामुळे कोणालाही त्रास होऊ नये, या उद्देशाने हे शिबिर पार पडले.या शिबिरात उमेश गायधनी (सचिव तथा ग्रामपंचायत सदस्य), शरद खराबे, दिपक पाखमोडे (नागपूर), माधव सावरकर, चुडामणी कंकलवार, आनंद नस्कोलवार, तुषार गिऱ्हेपुंजे, अक्षय गेडाम, मुकेश भांडारकर, क्रिष्णा गायधनी आणि मंगेश पाखमोडे यांनी उत्साहाने रक्तदान केले.

शासकीय रक्तपेढी, भंडारा येथील वैद्यकीय पथकाने रक्त संकलनाची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली. या पथकात डॉ. मधुरिका, डॉ. श्रीलक्ष्मी, डॉ. वृषाली चवडे, राजू नागदेवे, अश्विन नेवारे आणि सोहेल पठाण यांचा समावेश होता.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मंदिर समितीचे अध्यक्ष हरिदास पाखमोडे यांच्यासह बाळा शिवनकर, गिरीश बावनकुळे, पंकज चेटूले, नितीन कनोजकर, प्रा. उमेश सिंगणजुडे, एकनाथ पाखमोडे, रवींद्र पाखमोडे, नेहाल कांबळे आणि नारायण चाचेरे यांनी विशेष परिश्रम घेतले. हनुमान भक्तीसोबतच सामाजिक कर्तव्याची जाणीव जपणाऱ्या या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# भोंदू बाबा खरात सारख्या विकृती विरोधात अंधश्रद्धा निर्मूलन समितीची सभा.

**दैनिक युवक आधार**
**पंडीत फंगाळ (पनवेल )**:महाराष्ट्र राज्यातील अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या संघटन बांधणीच्या निमित्ताने आणि भोंदू बाबा अशोक खरात चा निषेध करण्यासाठी महाराष्ट्र राज्य संघटक हरिभाऊ पाथोडे आणि राष्ट्रीय उपाध्यक्ष रवींद्र खानविलकर तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते शशी गमरे ,कैलास मोहिते, जगन्नाथ साबळे सध्या कोकण दौऱ्यावर आहेत. यादरम्यान ते दि.४ एप्रिल २०२६ रोजी रायगड शाखेस भेट देणार आहेत. .रायगड शाखेतील कार्यकर्त्यांशी संवाद




साधण्यासाठी *दि.४ एप्रिल रोजी संध्या. ५..०० वा. के. आ. बाठिया हायस्कूल नवीन पनवेल.* या ठिकाणी सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर सभेमध्ये संघटन बांधणी बरोबर भोंदू बाबा अशोक खरात चा निषेध व्यक्त करण्यासाठी आणि सरकारला जादूटोणाविरोधी कायद्याच्या कठोर अंमलबजावणीची आठवण करून देण्यासाठी विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात येणार आहे. सदर सभा यशस्वी करण्यासाठी तसेच आपल्या परिसरातील अंधश्रद्धे संदर्भात चर्चा करण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समिती रायगड शाखेतील सर्व सदस्य व सभासद एकत्र येणार आहेत.

अध्यात्माचे ढोंग घेऊन समस्याग्रस्त स्त्री-पुरुषांचे शोषण करणाऱ्या, फसवणूक करणाऱ्या भोंदू खरात सारख्या विकृती समाजामध्ये अधून मधून निर्माण होण्याची कारणे तपासून त्यावर ठोस उपाययोजना काय करता येतील, या विषयावर विचारमंथन करण्यासाठी सदर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी समितीमध्ये काम करण्यास इच्छुक असणाऱ्या सर्व नागरिकांनी सदर सभेस आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा रायगड तर्फे करण्यात येत आहे.

# युद्ध आणि हिंसेच्या काळात भगवान महावीरांचे तत्त्वज्ञान जगासाठी ठरेल संजीवनी

आजचे जग बारुदाच्या ढिगाऱ्यावर बसले आहे. जर आपण जागतिक नकाशावर नजर टाकली, तर शांततेची बेटे कमी आणि संघर्षाचे निखारे अधिक दिसतात. रशिया-युक्रेनची न संपणारी युद्धभूमी असो, ढिगाऱ्यात बदलत असलेल्या गाझाच्या गल्ल्या असोत, सुदानमधील रक्तरंजित यादवी असो किंवा म्यानमारच्या धुमसणाऱ्या सीमा असोत. आज संपूर्ण मानवता स्वतःच निर्माण केलेल्या द्वेषाच्या आगीत होरपळत आहे.

आधुनिक विज्ञानाने आपल्याला विनाशाची अत्यंत घातक शस्त्रे नक्कीच दिली. पण शांततेने जगण्याचे शहाणपण मात्र आपल्याकडून हिरावून घेतले. अशा अत्यंत गंभीर परिस्थितीत २५०० वर्षांपूर्वी वर्धमान महावीरांनी मांडलेली तत्त्वे केवळ 'धार्मिक उपदेश' वाटत नाहीत. जागतिक अस्तित्व वाचवण्यासाठी ते एक मोठे 'रणनीतिक सूत्र' असल्याचे स्पष्ट जाणवते.

भगवान महावीरांचे तत्त्वज्ञान मुख्यत्वे तीन स्तंभांवर उभे आहे. आजच्या भू-राजकीय संकटांवर हा एक अत्यंत अचूक उपाय वाटतो. महावीरांच्या मते अहिंसा म्हणजे भित्रेपणा नाही. तर ती जगातील सर्वात मोठी ताकद आहे. "अहिंसा परमो धर्मः," असा मोठा संदेश त्यांनी जगाला दिला होता.

सध्या रशिया आणि युक्रेन तसेच अमेरिका-इस्रायल-इराण यांच्यात सुरू असलेला संघर्ष हा मुळात 'अहंकार' आणि 'विस्तारवाद' यातूनच निर्माण झाला आहे. हिंसा केवळ शरीराची नसते, तर ती वाणी आणि विचारांचीही असते, अशी मोठी शिकवण महावीर देतात.



जोपर्यंत एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राचे अस्तित्व अत्यंत सहिष्णुतेने स्वीकारणार नाही, तोपर्यंत युद्धाचे ढग अजिबात दूर होणार नाहीत. त्यांचा 'जगा आणि जगू द्या' हा विचार आजच्या काळातील हिंसक तत्त्वाला एक अत्यंत उत्तम आणि मानवी पर्याय आहे.

आजच्या जगात सर्वात मोठा संघर्ष 'विचारधारेचा' आहे. 'माझेच सत्य हे एकमेव सत्य आहे', हा दुराग्रहच इस्रायल- पॅलेस्टाईनसारख्या दशकानुदशके जुन्या संघर्षांचे मूळ कारण आहे. महावीरांनी 'अनेकांतवाद' हा अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत मांडला. सत्याचे अनेक पैलू असू शकतात, असा याचा सरळ अर्थ आहे.

आजच्या राजकारण्यांनी आणि राष्ट्रांच्या नेत्यांनी जर 'अनेकांतवाद' स्वीकारला, तर त्यांच्या ज्ञानात मोठी भर पडेल. विरोधी पक्षाचेही स्वतःचे एक सत्य असू शकते, हे त्यांना नक्कीच समजेल. हे तत्त्व 'वैचारिक सहिष्णुता' निर्माण करते.

जर आपण दुसऱ्याच्या दृष्टिकोनाला योग्य स्थान देण्यास सुरुवात केली, तर संवादाची दारे आपोआप उघडतील. युद्धाची भीषणताही स्वतःहून संपुष्टात येऊ लागेल. अनेकांतवाद हा खऱ्या अर्थाने आधुनिक 'लोकशाही' आणि 'बहुलवादाचा' मुख्य आत्मा आहे.

बहुतांश युद्धे ही जमीन, तेल, पाणी किंवा खनिजे बळकावण्यासाठीच लढली गेली आहेत, याला इतिहास पूर्णपणे साक्ष आहे. सुदान आणि मध्य आफ्रिकेत सुरू असलेल्या यादवीमागे संसाधनांची आंधळी शर्यतच कारणीभूत आहे. महावीरांचा 'अपरिग्रह' (गरजेपेक्षा जास्त साठा न करणे) हा सिद्धांत आजच्या 'उपभोक्तावादावर' एक अत्यंत मोठा आणि थेट प्रहार आहे.

मनुष्य आणि राष्ट्रांनी आपल्या गरजा मर्यादित ठेवायला शिकले पाहिजे. तसे झाल्यास संसाधनांसाठी होणारी ही मोठी मारामारी कायमची थांबू शकते. अपरिग्रह हा केवळ वैयक्तिक त्याग नाही. तर ते एक अत्यंत उत्तम 'आर्थिक मॉडेल' आहे. हे मॉडेल पर्यावरणीय समतोल आणि जागतिक न्यायाची मोठी शिकवण देते.

आज संपूर्ण जग दोन मोठ्या गटांत विभागले गेले आहे. एका बाजूला 'नाटो'सारख्या लष्करी आघाड्या आहेत, तर दुसऱ्या बाजूला त्यांचे विरोधक आहेत. या गटबाजीने शीतयुद्धाचा तो जुना काळ पुन्हा एकदा परत आणला आहे. आजच्या काळात 'अण्वस्त्रांचा धाक' हाच शांततेचा एकमेव आधार मानला जात आहे. पण केवळ भीतीवर आधारलेली ही शांतता खरोखरच टिकू शकेल का? हा एक मोठा प्रश्न आहे.

आजच्या काळात तिसरे महायुद्ध सुरू झाले आहे, असेच स्पष्ट चित्र दिसत आहे. हे युद्ध जगाच्या वेगवेगळ्या भागात तुकड्या-तुकड्यांत लढले जात आहे. इराण-अमेरिका-इस्रायल आणि रशिया-युक्रेनसह लहान-मोठी युद्धे, यादवी आणि वांशिक संघर्ष एकत्र केले, तर सध्या जगभरात तब्बल ६७ युद्धे सुरू आहेत.

म्यानमारपासून सीरियापर्यंत आज भाऊच भावाच्या रक्ताला तहानलेला दिसत आहे. अशा अत्यंत भीषण परिस्थितीत महावीरांचा 'आत्मौपम्य' (स्वतःप्रमाणेच इतरांना समजणे) हा सिद्धांत खूपच महत्त्वाचा ठरतो. जेव्हा आपण दुसऱ्याचे दुःख आपले स्वतःचे दुःख मानायला लागतो, तेव्हा हातातील तलवार आपोआप खाली गळून पडते.हा काळ माहितीच्या युद्धाचा आहे. आज द्वेष पसरवण्यासाठी 'डिजिटल हिंसेचा' मोठा आधार घेतला जात आहे. महावीरांची 'सत्य' आणि 'अचौर्य' (चोरी न करणे) ही शिकवण आपल्याला एक मोठा विचार देते. दिशाभूल करणाऱ्या माहितीच्या माध्यमातून एखाद्याच्या प्रतिष्ठेची चोरी करणे, ही देखील एक प्रकारची मोठी हिंसाच आहे.


भगवान महावीरांनी राजपाट सोडून जंगलात तपश्चर्या केली, कारण त्यांना जगापासून दूर पळायचे नव्हते. माणसाच्या आत लपलेल्या 'अंतर्गत शत्रूंवर' म्हणजेच राग, अहंकार, माया आणि लोभ यावर विजय मिळवण्यासाठी त्यांनी हा मोठा मार्ग निवडला होता."हजारो योद्ध्यांवर विजय मिळवणे खूप सोपे आहे, पण स्वतःवर विजय मिळवणे हाच खरा आणि सर्वात मोठा विजय आहे," असे त्यांनी अत्यंत स्पष्टपणे सांगितले होते. आजच्या काळातील पुतिन, नेतन्याहू किंवा इतर जागतिक नेत्यांना ज्या विजयाची मोठी आस लागली आहे, तो विजय मृतदेहांच्या ढिगाऱ्यावरून जातो. पण महावीरांचा विजय 'हृदयपरिवर्तनापासून' सुरू होतो. वर्तमान जगाला जर तिसऱ्या महायुद्धाच्या भीषणतेपासून वाचायचे असेल, तर 'संयुक्त राष्ट्रांच्या' जाहीरनाम्यासोबतच महावीरांच्या 'अनेकांतवादाचा' जाहीरनामाही आपल्या पटलावर ठेवावाच लागेल.भगवान महावीर आज केवळ जैन धर्माचे तीर्थंकर राहिले नाहीत. ते एक 'जागतिक नागरिक' म्हणून जगासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले आहेत. त्यांची शिकवण एका 'मलमपट्टीसारखी' आहे. युद्धग्रस्त जगाच्या खोल जखमा भरून काढण्याची मोठी ताकद या शिकवणीत आहे. शांतता ही केवळ लष्कराच्या माध्यमातून येणार नाही. 'परस्परोपग्रहो जीवानाम्' म्हणजेच सर्व सजीव एकमेकांना पूरक आहेत, याच विचारातून खऱ्या अर्थाने जगात शांतता प्रस्थापित होईल.

**- मंजीत ठाकूर**

## हनुमान जयंती: उपासनेकडून जागृतीकडे स्वत:ला शोधण्याची एक सुवर्णसंधी

**१. ऋणानुबंध: एक कृतज्ञतापूर्वक सुरुवात**

आज हनुमान जयंतीच्या या मंगल समयी, जेव्हा मी आपल्या समाजाचा उत्साह आणि प्रशासकीय यंत्रणेची धावपळ पाहतो, तेव्हा मला एक खोलवर अभिमान वाटतो. पण या उत्सवाच्या गदारोळात मी जेव्हा स्वतःच्या अंतर्मनात डोकावतो, तेव्हा मला जाणीव होते की, हे केवळ एक 'सेलिब्रेशन' नाही. हा तर एक प्रवास आहे— ज्या समाजाने आणि निसर्गाने आपल्याला घडवले, त्या मातीचे ऋण फेडण्यासाठी स्वतःला पुन्हा एकदा समर्पित करण्याचा. हा उत्सव म्हणजे मला आणि तुम्हांला मिळालेली एक अशी संधी आहे, जिथे आपण आपल्या सार्वजनिक कर्तव्याला आध्यात्मिक अधिष्ठान देऊ शकतो.




**२. मूळ तत्त्वज्ञान: वेगातील हरवलेली जाणीव**

"मनोजवं मारुततुल्यवेगमं"— हनुमानजींचा वेग मनासारखा आणि वाऱ्यासारखा आहे. आजच्या जगात मी पाहतोय की, आपणही तोच वेग धारण केला आहे. पण हा वेग आपल्याला कुठे नेतोय? आपण शक्तिशाली झालो आहोत, पण शहाणे झालो आहोत का? आपण 'कनेक्टेड' आहोत, पण 'कॉन्शस' आहोत का? मला असे वाटते की, आपण आज 'इंपल्स' (आवेग) द्वारे चाललो आहोत, 'पर्पज' (उद्देश) द्वारे नाही. निसर्गाचा ऱ्हास आणि मनाची अस्वस्थता ही केवळ बाहेरची संकटे नसून, आपल्या अंतर्मनातील हरवलेल्या संतुलनाचे प्रतिबिंब आहेत, असे मला प्रामाणिकपणे वाटते.

**३. कृतीशील उत्तरदायित्व: आचरणातील शुद्धता**

हनुमानजींना आपण 'जितेंद्रिय' म्हणतो—ज्यांनी स्वतःच्या इंद्रियांवर विजय मिळवला. जेव्हा मी आजच्या चंगळवादाकडे पाहतो, तेव्हा मला जाणवते की खरी ताकद दुसऱ्यावर राज्य करण्यात नाही, तर स्वतःच्या उपभोगावर मर्यादा घालण्यात आहे. माझ्या लेखी, मारुतीरायाची भक्ती ही केवळ मंदिरात दिवा लावण्यापुरती मर्यादित असूच शकत नाही. जर मी नदी प्रदूषित करत असेन आणि त्याच वेळी देवाला अभिषेक करत असेन, तर ती भक्ती नाही, तो एक विरोधाभास आहे. आपल्या भागीदारीतील खरा 'डिलिव्हरेबल' (अंतिम परिणाम) हा आपल्या दैनंदिन आचरणात उतरला पाहिजे. "कोणीही मागे राहू नये" हा विचार जेव्हा माझ्या कृतीतून दिसेल, तेव्हाच मी स्वतःला खरा रामदूत म्हणवून घेऊ शकेन.

**४. दूरगामी दृष्टीकोन: सुसंवादाचा वारसा**

हा बदल एका रात्रीत होणार नाही, याची मला कल्पना आहे. त्यासाठी आपल्याला सातत्य आणि संयम हवा. जेव्हा आपण निसर्गाशी आणि स्वतःशी सुसंवाद साधतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने समाजात 'वास्तविक सुसंवाद' निर्माण होतो. हनुमानजींचे आयुष्य हा केवळ एक इतिहास नाही, तर तो आपल्यासाठी 'कॉन्शस लिविंग'चा (जाणीवपूर्वक जगण्याचा) एक ब्ल्यू प्रिंट आहे. आपण निसर्गाचे मालक नसून त्याचे 'केअरटेकर' आहोत, ही जाणीवच आपल्याला भविष्यातील संकटांपासून वाचवू शकेल.

**५. संकल्पाचे पाऊल: उपासनेकडून प्रकटीकरणाकडे**

शेवटी, हे माझे विचार कोणावर लादण्यासाठी नाहीत, तर हा माझ्या स्वतःच्या संकल्पाचा एक भाग आहे. मला असे वाटते की, आपण सर्वांनीच आता घाई सोडून, शांतपणे स्वतःशी संवाद साधण्याची हीच ती वेळ आहे. या हनुमान जयंतीला आपण केवळ त्यांच्यासमोर नतमस्तक न होता, त्यांच्यातील गुण आपल्यात कसे उतरतील, याचा शोध घेऊया. कारण, मानवतेचे आणि आपल्या धरणीमातेचे भवितव्य आपण कोणाची पूजा करतो यावर नाही, तर आपण 'काय बनतो' यावर अवलंबून आहे.

**विजयकुमार कट्टी**

## ठाणे जिल्ह्याची सुरक्षा होणार अधिक दमदार..!

## NDRF आणि SDRF च्या माध्यमातून प्रशासनाकडून आपत्ती व्यवस्थापनासाठी विशेष मोहीम

**भिवंडी :** नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या काळात नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ठाणे जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात १ एप्रिल ते १५ एप्रिल २०२६ या कालावधीत 'परिचय सराव कार्यक्रम' (Familiarization Exercise Program) आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF) यांच्या संयुक्त विद्यमाने राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमामुळे जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम होणार आहे. या सराव कार्यक्रमासाठी एनडीआरएफ आणि एसडीआरएफचे एकूण २५ अनुभवी अधिकारी व कर्मचारी



ठाणे जिल्ह्यात दाखल झाले आहेत. यामध्ये १ राजपत्रित अधिकारी (GO), २ दुय्यम अधिकारी आणि २२ अन्य पदांच्या जवानांचा समावेश आहे. ही तुकडी जिल्ह्यातील विविध महानगरपालिका क्षेत्रांत आणि ग्रामीण भागात जाऊन स्थानिक यंत्रणेला प्रशिक्षित करणार आहे.

निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.संदीप माने यांनी या उपक्रमाच्या नियोजनासाठी सर्व संबंधित विभागांना सविस्तर सूचना दिल्या आहेत. या प्रशिक्षणात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.अनिता जवंजाळ यांच्यासह जिल्ह्यातील सर्व प्रांताधिकारी व तहसिलदार सक्रिय सहभाग नोंदविणार आहेत. केवळ शासकीय अधिकारीच नव्हे, तर स्थानिक स्वयंसेवक, नागरी संरक्षण दल, पोलीस पाटील आणि 'आपदा मित्र-सखी' यांनाही या सरावात निमंत्रित करण्यात आले आहे. यामुळे आपत्तीच्या वेळी प्रत्यक्ष घटनास्थळी धावून जाणाऱ्या स्थानिक मदतीला तांत्रिक ज्ञानाची जोड मिळणार आहे.

जिल्ह्यातील विविध ठिकाणी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या वेळेत हे प्रशिक्षण होणार असून प्रत्येक सत्रात २०० प्रशिक्षणार्थी सहभागी होतील.

२ एप्रिल: नवी मुंबई महानगरपालिका (मुख्यालय सभागृह)

४ एप्रिल: उल्हासनगर महानगरपालिका (सिधूभवन ऑडिटोरियम)

६ एप्रिल: ठाणे महानगरपालिका (नरेंद्र बल्लाळ हॉल)

७ एप्रिल: मिरा-भाईंदर महानगरपालिका (नगर भवन, भाईंदर प.)

८ एप्रिल: भिवंडी निजामपूर महानगरपालिका (राजय्या गाजेंगी हॉल)

९ एप्रिल: तहसिलदार कार्यालय शहापूर (शेतकी भवन)

१० एप्रिल: कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (बिर्ला कॉलेज, कल्याण)

१३ एप्रिल: तहसिलदार कार्यालय, मुरबाड (MIDC सभागृह)

१५ एप्रिल: तहसिलदार कार्यालय अंबरनाथ (आदर्श हायस्कूल, बदलापूर)

या उपक्रमामुळे स्थानिक प्रशासनाला आपत्तीच्या वेळी NDRF सारख्या यंत्रणांसोबत समन्वय कसा ठेवावा, अत्याधुनिक उपकरणांचा वापर कसा करावा आणि बचाव कार्य अधिक वेगाने कसे करावे, याचे प्रत्यक्ष ज्ञान मिळणार आहे.

ठाणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचा हा पुढाकार जिल्ह्याच्या सुरक्षिततेसाठी मैलाचा दगड ठरणार असून,

ठाणे जिल्हा प्रशासनाच्या या तत्परतेमुळे नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## कला शिक्षक सुनील काठोळे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार !

**वासिंद :** येथील सरस्वती विद्यालयातील कला शिक्षक सुनील काठोळे यांना महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळाच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळ, आयोजित 44 वी कलाशिक्षण परिषद दि. 28 ते 29 मार्च, 2026 रोजी छत्रपती शाहूनगरी, राजधानी सातारा येथे संपन्न झाली या कलाशिक्षण परिषदेत सन 2025-26 च्या राज्यस्तरीय आदर्श कलाशिक्षक




पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यामध्ये गेल्या 32 वर्षापासून कला अध्यापनाचे काम करणारे शिक्षक सुनील नामदेव काठोळे यांना त्यांच्या या योगदानामुळे राज्यस्तरीय आदर्श कलाशिक्षक पुरस्कार प्रदान करून सन्मान करण्यात आले. तर यावेळी राज्यातील 36 जिल्ह्यातील आदर्श कलाशिक्षकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबाबत विद्या विकास मंडळाचे चेअरमन विठ्ठल सातवी, सचिव रविंद्र शेलार, विद्यालयाचे प्राचार्य व्ही.टी.भोईर, पर्यवेक्षक के.एन.धनगर, एस.एम.जाधव यांच्यासह शाळेतील शिक्षक-शिक्षिकेत्तर, नागरिक व विविध शैक्षणिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी शुभेच्छा देत अभिनंदन केले आहे.या कार्यक्रमाप्रसंगी कलाध्यापक संघ महामंडळ राज्य अध्यक्ष नरेंद्र बारई, राज्य सरचिटणीस दिगंबर बेंडाळे, मुंबई विभाग उपाध्यक्ष विलास सेसाने, जिल्हा अध्यक्ष उमाकांत बोके, जिल्हा सचिव अमोल पाटील, जिल्हा उपाध्यक्ष, अशोक शेलार, निलेश रोठे, आदी मान्यवर तसेच तालुका अध्यक्ष शंभूराव सोनवणे, कलाध्यापक संजय पानपाटील, दिनेश भोईर, राहुल निक्ते, सुनिल सुर्यवंशी आदी पदाधिकारी उपस्थित होते.